सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. २५ जुलै २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १०२ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## थोडक्यात

### विद्यार्थिनीला बेदम मारहाण; अपमान सहन न झाल्याने चौथीत शिकणाऱ्या मुलीची आत्महत्या

**उत्तर प्रदेश :** मुझफ्फरनगरमधील इयत्ता चौथीत शिकणाऱ्या १० वर्षाच्या मुलीने दिनांक १० जुलै रोजी तिच्या राहत्या घरी आत्महत्या केली. शाळेतील शिक्षकांनी मारहाण तसेच १० रुपये चोरल्याचा आरोप करून सर्वांसमोर अपमानित केले यानंतर काही तासांतच तिने टोकाचे पाऊल उचलले.मुलीच्या वडिलांनी केलेल्या तक्रारीनंतर पोलिसांनी बुधवारी रात्री दोन सरकारी शाळेतील शिक्षकांविरुद्ध एफआयआर दाखल केला आहे. आयुषी ही मुझफ्फरनगर जिल्ह्यातील पचेंडा कलान येथील शासकीय प्राथमिक शाळेत इयत्ता चौथीमध्ये शिकत होती, तिच्या कुस्तीच्या खेळामुळे ती स्थानिक पातळीवर चर्चेत होती. पैलवान बनण्याचे स्वप्न पाहणारी आयुषी आखाड्यात नियमितपणे सराव करत असे.

### तुझ्या आईचे गावात बऱ्याच लोकांशी प्रेमसंबंध, म्हणून... पतीस जन्मठेप

**धुळे :** अनैतिक संबंधाचा संशय घेऊन पत्नीची हत्या करणाऱ्या नराधम पतीस जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. साक्री तालुक्यातील डांग शिरवाडे येथील मंदाबाई दिलीप सोनवणे या ४८ वर्षीय महिलेची तिच्याच पतीने हत्या केली होती. या नराधम पतीस प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश धुळे श्रीमती एस. एस. भिष्म यांनी जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. या गुन्ह्यामध्ये सरकारी वकील गणेश पाटील यांनी उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाचे संदर्भ देत या गुन्ह्यामध्ये आरोपीस कठोर शिक्षा देण्याची मागणी केली. ही मागणी न्यायालयाने मान्य केली. साक्री तालुक्यातील डांग शिरवाडे याठिकाणी ही घटना घडली होती. डांग शिरवाडे येथील मंदाबाई दिलीप सोनवणे या शेतामध्ये पिकांना पाणी भरण्यासाठी गेल्या होत्या, मात्र त्या घरी परतल्याच नाहीत. त्यांचे पती दिलीप हिराजी सोनवणे हे देखील घरी नसल्यामुळे त्यांची मुलगी सोनाबाई दिलीप सोनवणे ही आई वडीलांना पाहण्यासाठी शेताकडे गेली. त्यावेळेस तिला धक्कादायक गोष्ट पहायला मिळाली.

# न्यायालयाच्या कामकाजाचे व्हिडिओ सोशल मीडियावर पोस्ट करण्यास बंदी

## परवानगीशिवाय शेअर केल्यास होणार कारवाई



**नवी दिल्ली:** न्यायालयीन कामकाजाचे व्हिडिओ, ऑडिओ क्लिप्स आणि थेट प्रक्षेपणाचे (लाइव्ह-स्ट्रीम) चित्रीकरण परवानगीशिवाय सोशल मीडियावर पोस्ट करण्याविरोधात सर्वोच्च न्यायालयाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि कठोर आदेश जारी केला आहे. यापुढे न्यायालयाच्या कामकाजाचे कोणतेही रेकॉर्डिंग पूर्वपरवानगीशिवाय डिजिटल प्लॅटफॉर्मवर शेअर किंवा प्रसारित केल्यास कठोर कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते. न्यायालयाची प्रतिष्ठा जपण्याच्या आणि कामकाजाचा गैरवापर रोखण्याच्या दिशेने हे एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

**काय आहेत सर्वोच्च न्यायालयाचे नवीन नियम?**

भारताचे सरन्यायाधीश आणि न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने आपल्या आदेशात स्पष्ट केले आहे की, सर्वोच्च किंवा कोणत्याही उच्च न्यायालयाच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण (लाइव्ह-स्ट्रीम) किंवा रेकॉर्डिंग परवानगीशिवाय सोशल मीडिया किंवा इतर कोणत्याही डिजिटल प्लॅटफॉर्मवर पोस्ट, रिपोस्ट, अपलोड किंवा शेअर करता येणार नाही. इतकेच नाही, तर अशा व्हिडिओंमधून कोणत्याही स्वरूपात पैसे कमावण्यावरही पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. हा नियम मोडायचा असेल, तर संबंधित न्यायालयाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील. यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या प्रकरणात 'सेक्रेटरी जनरल'ची तर उच्च न्यायालयांच्या प्रकरणांमध्ये संबंधित उच्च न्यायालयाच्या 'रजिस्ट्रार जनरल'ची परवानगी घेणे आवश्यक असेल. ही परवानगी घेतल्याशिवाय कोणताही व्हिडिओ किंवा ऑडिओ इंटरनेटवर शेअर करता येणार नाही.

### बंदी घालण्याचे मुख्य कारण काय?

**न्यायसंस्थेच्या मते, अनेकदा न्यायालयाच्या थेट प्रक्षेपणातून (लाइव्हस्ट्रीममधून) एखादी छोटी क्लिप किंवा छोटा भाग काढून तो एडिट केला जातो. व्हिडिओ किंवा ऑडिओमध्ये फेरफार करून किंवा तो वेगळ्याच संदर्भात सादर करून सोशल मीडियावर व्हायरल केला जातो. अशा अपूर्ण, छेडछाड केलेल्या किंवा बदल केलेल्या व्हिडिओंमुळे समाजात गैरसमज पसरू शकतात आणि थेट न्यायिक प्रक्रियेवर किंवा निकालांवर विपरीत परिणाम होऊ शकतो. हा अनधिकृत वापर थांबवण्यासाठीच सर्वोच्च न्यायालयाने हे कठोर निर्बंध लागू केले आहेत.**

**वृत्तवार्तांकनावर परिणाम होणार का? :**

या आदेशामुळे सर्वसामान्य नागरिकांना आणि सोशल मीडिया युजर्सना जरी निर्बंधांचा सामना करावा लागणार असला, तरी न्यायालयाचा हा आदेश वृत्तसंस्था आणि प्रसारमाध्यमांच्या पत्रकारितेला लागू होणार नाही. न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, या निर्णयाचा वृत्त वार्तांकनावर किंवा बातमी प्रसारावर कोणताही परिणाम होणार नाही. म्हणजेच, वृत्तवाहिन्या, वृत्तपत्रे आणि अधिकृत वृत्तसंस्था पूर्वीप्रमाणेच न्यायालयीन कामकाजाशी संबंधित कायदेशीर घडामोडींच्या बातम्या प्रसिद्ध आणि प्रसारित करू शकतील. ही बंदी केवळ अनधिकृत ऑडिओ-व्हिडिओ रेकॉर्डिंगचा वापर, शेअरिंग आणि त्यातून होणारी कमाई यावरच लागू आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात कोसळले झाड, 8 ते 10 वाहनांचे नुकसान



**नाशिक :** नाशिक जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात भलेमोठे लिंबाचे झाड कोसळल्याची घटना घडली आहे. येथील पार्किंग मध्ये असलेले एक भलेमोठे लिंबाचे झाड अचानक तेथे उभ्या असलेल्या चारचाकी वाहनांवर कोसळले. हे झाड कोसळून ८ ते १० वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने या घटनेत कोणत्याही प्रकारची जीवितहानी झालेली नाही.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारातील पार्किंगमध्ये अनेक शासकीय अधिकारी आणि कामानिमित्त आलेल्या नागरिकांची वाहने उभी होती. मात्र अचानक पार्किंगमधील जुने आणि भलेमोठे लिंबाचे झाड मुळासकट उन्मळून गाड्यांवर पडले. झाड मोठे असल्याने त्याखाली दाबल्या गेलेल्या ८ ते १० चारचाकी गाड्यांचा चक्काचूर झाला आहे. दरम्यान, झाड कोसळताच मोठा आवाज झाल्याने परिसरात एकच घबराट पसरली. सुदैवाने, झाड पडले त्या क्षणी वाहनांमध्ये किंवा झाडाखाली कोणीही नागरिक उपस्थित नव्हते. त्यामुळे या घटनेत कोणतीही जीवितहानी वा दुखापत झालेली नाही. घटनेची माहिती मिळताच आपत्ती व्यवस्थापन पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.

या घटनेत आय-१०, बोलेरो, फॉर्च्युनरसह अनेक वाहनांचे नुकसान झाले असून, शहरातील धोकादायक व कमकुवत वृक्षांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. दरम्यान, रस्त्यावरील आणि वाहनांवरील झाडाच्या फांद्या कापून गाड्या बाजूला काढण्याचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे. या घटनेमुळे काही काळ जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात गोंधळाचे आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

# कर्तव्यावर जात असतानाच काळाचा घाला; चिमनापूर येथील शिक्षक समाधान सोनवणे यांचा अपघाती मृत्यू


तभा वृत्तसेवा


कन्नड, दि. २४ जुलै - कन्नड तालुक्यातील चिमनापूर येथील रहिवासी तथा लासूर स्टेशन येथील जिल्हा परिषद शाळेत कार्यरत असलेले शिक्षक समाधान रतन सोनवणे (वय अंदाजे ३३) यांचा गौताळा अभयारण्याच्या कमानीजवळ दि २४ रोजी सकाळी झालेल्या दुर्दैवी दुचाकी अपघातात मृत्यू झाला. कर्तव्यावर जात असतानाच काळाने घाला घातल्याने चिमनापूरसह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

माहितीनुसार, समाधान सोनवणे हे शुक्रवारी सकाळी सुमारे ७ वाजता चिमनापूर येथील आपल्या घरातून दुचाकी (क्र. एमएच-४६ बीई ०५६५) वरून लासूर स्टेशन येथील जिल्हा परिषद शाळेत कर्तव्यावर जाण्यासाठी निघाले होते. मात्र गौताळा अभयारण्याच्या कमानीजवळ त्यांच्या दुचाकीचा भीषण अपघात झाला. अपघाताची माहिती मिळताच फौजदार त्रिलोकचंद पवार घटनास्थळी दाखल झाले व पुढील कार्यवाही करण्यात आली.



घटनेची माहिती मिळताच कन्नड ग्रामीण रुग्णालयात नातेवाइकांनी मोठी गर्दी केली. आपल्या लाडक्या मुलाला, पतीला आणि वडिलांना गमावल्याचे दुःख अनावर झाल्याने रुग्णालय परिसरात एकच आक्रोश उसळला. उपस्थितांचेही डोळे पाणावले. समाधान सोनवणे यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी आणि दोन लहान मुले असा परिवार आहे. कुटुंबाचा आधारवड हिरावल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दुपारी चिमनापूर येथे शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्ययात्रेला ग्रामस्थ, शिक्षक, विद्यार्थी, नातेवाईक आणि विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या अकाली निधनाने चिमनापूर गावासह शिक्षण क्षेत्रात शोककळा पसरली असून, कर्तव्यदक्ष आणि विद्यार्थीप्रिय शिक्षकाला अश्रुपूर्ण निरोप देण्यात आला.

## दि.बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत दिवंगत अजित दादा पवार यांना श्रध्दांजली

**बीड (प्रतिनिधी):** दि.बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मुख्य कार्यालयातील श्रीपतराव कदम सभागृहात दिवंगत मा. अजित दादा पवार यांच्या जयंती निमीत्त भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. दिनांक 22.07.2026 रोजी मा.अजित दादा पवार यांच्या प्रतिकृतीस हार व पुष्प अर्पण करण्यात आले. या वेळी बँकेचे मा. प्राधिकृत अधिकारी समिती सदस्य श्री.सतीश पोकळे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.श्री.एम.पी. कोलवाडकर, प्र. व्यवस्थापक प्रशासन व बोर्ड श्री. आर.व्ही.उबाळे, प्र.व्यवस्थापक वसुली व बँकिंग श्री.के. यु.आघाव तसेच बँक अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नानाजी देशमुख विद्यामंदिर येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती साजरी

**बीड :** सर्वप्रथम लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. अध्यक्ष इयत्ता दुसरीतील अनन्या गायकवाड व प्रमुख पाहुणे म्हणून इयत्ता पहिली तील शांभवी कुलकर्णी यांनी पद भूषवले. तसेच प्रल्हाद गटातील कार्तिकी गोंगाने या विद्यार्थिनीने माहिती सांगितली. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच अशी सिंहगर्जना करणारे लोकमान्य टिळक होते. टिळकांनी केसरी व मराठा ही वृत्तपत्रे सुरू केली. समाजात एकता व राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्यासाठी त्यांनी सार्वजनिक शिवजयंती व गणेशोत्सव सुरू केले. त्यांनी गीतारहस्य हा ग्रंथ लिहिला.. त्यांना भारतीय असंतोषाचे जनक असे म्हणतात. विद्यार्थ्यांना लोकमान्य टिळकांविषयी ताईंनी मार्गदर्शनपर माहिती सांगितली. लोकमान्य टिळक यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.यावेळी मुख्याध्यापिका अर्चनाताई मोराळे , गोकुळ शिशू वाटिका प्रमुख आरती कंपू सर्व शिक्षक वृंद विद्यार्थी उपस्थित होते.

## चंद्रशेखर गायकवाड यांना वनस्पतीशास्त्र विषयात पीएच डी प्रदान

**केज :** शहरातील बाबुरावजी आडसकर महाविद्यालयातील प्रा. चंद्रशेखर त्र्यंबक गायकवाड यांना, जवळबन तलावातील शेवाळांची जैवविविधता व पाण्यातील विविध घटकांची परिणामकारकता (Algal flora and water quality analysis in Jawalban dam) या विषयावरील संशोधनास डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांनी पीएचडी ही पदवी प्रदान केली. संशोधक मार्गदर्शक प्रो (डॉ.) नवनाथ काशीद, वनस्पतीशास्त्र विभाग, बाबुरावजी आडसकर महाविद्यालय केज, जिल्हा बीड यांनी मार्गदर्शन केले. प्रा चंद्रशेखर गायकवाड यांच्या या यशाबद्दल श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या सचिव श्रीमती अर्चनाताई रमेशराव आडसकर , अंबाजोगाई साखर कारखान्याचे चेअरमन श्री रमेशराव आडसकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल किर्दत व सर्व शिक्षक शिक्षकेतर यांच्यासह माळेगाव येथील ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

## आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या विरोधात पुकारलेल्या आंदोलनात सामिल व्हा:राजू जोगदंड

**बीड/प्रतिनिधी :** अनु-जातीच्या आरक्षणामध्ये अबकड उपवर्गीकणाचा मुद्दा समोर ठेवून आपल्या राजकीय फायद्यासाठी 59 जातीमध्ये फूट पाडण्याचे षडयंत्र राज्यकर्त्यांकडून राज्यभर राबविण्यात येत आहे. उपवर्गीकरण लागू करण्यासाठी सुरू असलेले षडयंत्र हाणून पाडण्यासाठी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या आदेशावरुन उपवर्गीकरणाच्या विरोधात युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली सोमवार दि.27 जुलै 2026 रोजी सकाळी 11 वाजता बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर रिपाइंच्या वतीने तिव्र निदर्शने आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.

## राज्यस्तरीय थायबॉक्सिंग स्पर्धेत तुलसी इंग्लिश स्कूलच्या तीन खेळाडूंची निवड

**बीड (प्रतिनिधी) :** देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी थायबॉक्सिंगमध्ये दमदार कामगिरी करत राज्यस्तरीय स्पर्धेत प्रवेश मिळविला आहे. जिल्हास्तरीय स्पर्धेतील उल्लेखनीय यशामुळे शाळेच्या क्रीडा कामगिरीत आणखी एका गौरवशाली यशाची नोंद झाली आहे.

दि. १३ जुलै रोजी थायबॉक्सिंग असोसिएशनच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय स्पर्धेत शाळेच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. या दमदार कामगिरीच्या जोरावर दि. २५ व २६ जुलै रोजी छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय थायबॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी शाळेच्या तीन विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. निवड झालेल्या खेळाडूंमध्ये आकाश अविनाश जाधव (सब-ज्युनियर, ४८ किलोखालील वजनगट), राजवर्धन जगन्नाथ चव्हाण (सब-ज्युनियर, ४० किलोखालील वजनगट) आणि हर्षद महादेव शिरसाठ (ज्युनियर, ६५ ते ७० किलो वजनगट) यांचा समावेश आहे. या यशामागे थायबॉक्सिंग प्रशिक्षक मोसिम शेख यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले असून त्यांच्या सातत्यपूर्ण प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय स्पर्धेपर्यंत यशस्वी मजल मारली आहे.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेच्या प्राचार्या उमा जगतकर यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच शिक्षकवृंदानेही विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे कौतुक करत आगामी स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करण्याचा विश्वास व्यक्त केला.

# वारकरी सेवा हीच ईश्वर सेवा; भंडी शेगाव येथे हजारो वारकऱ्यांसाठी महापंगत

### माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे विठुरायाचे दर्शन; वारकऱ्यांना दिल्या आषाढी वारीच्या शुभेच्छा

**पंढरपूर दि.24 (प्रतिनिधी):-** आषाढी वारीनिमित्त पंढरपूर येथील भंडी शेगाव परिसरात माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या पुढाकारातून वारकऱ्यांसाठी भव्य महापंगतीचे आयोजन करण्यात आले होते. हजारो वारकऱ्यांनी या महापंगतीचा लाभ घेतला. यावेळी जयदत्त क्षीरसागर यांनी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात जाऊन विठुरायाच्या चरणी नतमस्तक होत दर्शन घेतले. राज्यातील जनतेच्या सुख, समृद्धी आणि कल्याणासाठी त्यांनी विठुरायाच्या चरणी प्रार्थना केली.



महापंगतीनंतर आयोजित कार्यक्रमात बोलताना जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, वारकरी सेवा हीच ईश्वर सेवा आहे. विठुरायाच्या भक्तांची सेवा करण्याचे भाग्य लाभणे ही माझ्यासाठी आनंदाची आणि समाधानाची बाब आहे. संत परंपरेचा वारसा जपणारी वारी ही महाराष्ट्राच्या संस्कृतीची ओळख असून सर्व वारकऱ्यांना आषाढी वारीच्या मनःपूर्वक शुभेच्छा देतो.

या प्रसंगी ह.भ.प.प्रकाश महाराज बोधले,समाधान महाराज शर्मा,माजी मंत्री बबनराव पाचपुते, अरुण डाके, नवनाथ कुलकर्णी, महेंद्र फुटाणे,जगदीश लाटे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

सेवाभावातून आयोजित करण्यात आलेल्या या महापंगतीत वारकऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. महापंगतीच्या माध्यमातून वारकऱ्यांची करण्यात आलेली सेवा आणि आदरातिथ्याबद्दल उपस्थितांनी समाधान व्यक्त करत आयोजकांचे कौतुक केले. आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर विठुरायाच्या भक्तांसाठी आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम वारकरी संप्रदायातील सेवाभाव आणि सामाजिक बांधिलकीचे प्रतीक ठरला. माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी बीड जिल्ह्यातून आलेल्या प्रत्येक दिंडीला भेट देऊन पाहणी केली आणि सर्वांना शुभेच्छाही दिल्या, ठिकठिकाणी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे स्वागत करण्यात आले.

## अनुकंपा धारकांना नोकरी मिळण्याची प्रक्रिया गतिमान करा : विवेक जॉन्सन

### माहिती न देणाऱ्या व अनुपस्थित कार्यालय प्रमुखांना कारणे दाखवा नोटीस

**बीड, दि. 23 (जिमाका) :-** सामान्य प्रशासन विभागाच्या 15 जुलै 2025 रोजीच्या शासन निर्णयानुसार गट-क पदासाठी अनुकंपा नियुक्तीची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. यानुसार जिल्ह्यातील सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडून अनुकंपाधारक उमेदवारांची अद्ययावत प्रतीक्षासूची व रिक्त पदांची माहिती मागविण्यात आली होती. मात्र, अद्यापही काही कार्यालय प्रमुखांनी ही माहिती सादर केलेली नाही. अनुकंपा धारकांना रिक्त पदावर लवकरात लवकर नोकरी देण्याचा माझा मानस आहे. तरी अनुकंपा धारकांना वेळेत नोकरी मिळण्यासाठी प्रक्रिया गतिमान करा, असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रगती सभागृहात अनुकंपा नियुक्ती प्राधिकारी यांची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे यांच्यासह जिल्ह्यातील विविध विभागांचे कार्यालय प्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बैठकीत प्रत्येक विभागाच्या प्रमुखांकडून रिक्त पदांची माहिती प्रत्यक्ष जाणून घेतली. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी पत्राद्वारे रिक्त पदांची माहिती मागवूनही काही कार्यालय प्रमुखांनी ती अद्यापही सादर केलेली नाही. याबाबत त्यांनी तिव्र नाराजी व्यक्त करत माहिती सादर न करणाऱ्या तसेच बैठकीस अनुपस्थित असणाऱ्या कार्यालय प्रमुखांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात यावी, असे आदेश दिले.

## शिबिरांचा लाभ घेण्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे आवाहन

### जिल्ह्यात विधानसभानिहाय छत्रपती शिवाजी महाराज; महाराजस्व समाधान शिबीर अभियानाचे आयोजन

**बीड, दि. 24 (जिमाका) :-** राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनेनुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त व माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित बीड जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघामध्ये छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान आयोजित करण्यात आले आहे. तरी नागरिकांनी महसूल प्रशासनाशी संबंधित विविध कामांसाठी आणि विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.

बीड जिल्ह्यात विधानसभा मतदारसंघनिहाय माजलगाव, गेवराई, आष्टी, केज, परळी वैजनाथ आणि बीड येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाचे आयोजन पुढीलप्रमाणे आहे. यामध्ये माजलगाव विधानसभेत दि.26 जुलै 2026 रोजी सकाळी 11 वाजता माऊली लॉन्स गढी रोड माजलगाव येथे घेण्यात येणार आहे. नोडल अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

गेवराई विधानसभा मतदारसंघात दि.26 जुलै 2026 रोजी सकाळी 11 वाजता बेद्रे लॉन्स, कोल्हेर रोड, गेवराई येथे घेण्यात येणार आहे. नोडल अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी शुभम पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

आष्टी विधानसभा मतदारसंघात दि.27 जुलै 2026 रोजी सकाळी 11 वाजता मोरेश्वर मंगल कार्यालय, नगर रोड आष्टी येथे घेण्यात येणार आहे. नोडल अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी वशिमा शेख यांची नियुक्ती करण्यात आली आहे. केज विधानसभा मतदारसंघात दि.28 जुलै 2026 रोजी सकाळी 11 वाजता आर्यवीर मंगल कार्यालय, केज येथे घेण्यात येणार आहे. नोडल अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी दीपक बजाळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# दिवसा रेखी अन् रात्री घरफोडी करणारी टोळी निष्पन्न

### एक आरोपी अटक, पाच लाखांचा मुद्देमाल जप्त

**बीड :** दिवसा रेखी करून रात्रीच्या वेळी घरफोडी करणाऱ्या एका अट्टल टोळीचा बीड स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली असून त्याच्याकडून तीन तोळे सोने आणि १० भार चांदी असा एकूण पाच लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे पिंपळनेर आणि वडवणी पोलीस ठाण्यांतर्गत दाखल असलेले दोन गंभीर घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. पिंपळनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणारे फिर्यादी हे कुटुंबासह झोपलेले असताना चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने लंपास केले होते. या तक्रारीवरून पिंपळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पथक करत असताना, तांत्रिक विश्लेषण आणि गुप्तहेरांच्या माहितीच्या आधारे हा गुन्हा खांडवी तांडा (ता. गेवराई) येथील गुन्हेगारांनी केल्याचे समोर आले. मुख्य आरोपी कृष्णा शेषेराव राठोड (वय २५, रा. अंबुनाईक तांडा, गेवराई) हा नाळवंडी तांडा येथे आल्याची खात्रीशीर माहिती मिळताच पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले.

## ग्रामोद्योग भरारी पुरस्कारासाठी नामांकने सादर करावेत

**बीड, दि. 24 (जिमाका) :-** महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या वतीने देण्यात येणाऱ्या 5 व्या ग्रामोद्योग भरारी पुरस्कार-2026 साठी नामांकने मागविण्याची प्रक्रिया अधिकृतपणे सुरू झाली आहे. ग्रामीण भागातील उद्योग, व्यवसाय आणि हस्तकलानिर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी मंडळाने ही विशेष पुरस्कार योजना सुरू केली असून, यंदा या पुरस्काराचे चौथे वर्ष आहे. ग्रामोद्योगाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या जिल्ह्यातील उद्योजक, कारागीर आणि संस्थांनी या पुरस्कारासाठी आपले नामांकन अर्ज मुदतीत सादर करावेत, असे आवाहन महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या बीड जिल्हा कार्यालयाकडून करण्यात आले आहे. अर्ज मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर www.mskvib.org उपलब्ध आहेत. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, जिल्हा कार्यालय, बीड येथून थेट अर्ज प्राप्त करता येतील. इच्छुक अर्जदारांनी आपले संपूर्ण भरलेले नामांकन अर्ज दि. 28 जुलै 2026 पूर्वी जिल्हा कार्यालयात जमा करणे बंधनकारक आहे. अंतिम मुदतीनंतर येणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. अधिक माहितीसाठी जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, द्वारा- जिल्हा उद्योग केंद्र, जालना रोड, बीड येथे संपर्क साधावा. असेही कळविले आहे.

## जागतिक कौशल्य स्पर्धेसाठी नाव नोंदणीचे आवाहन

**बीड, दि. 24 (जिमाका) :-** जगातील सर्वात मोठ्या व्यावसायिक शिक्षण आणि कौशल्य उत्कृष्टता स्पर्धेत सहभाग नोंदवून भारताचे प्रतिनिधित्व करण्याची सुवर्णसंधी तरुणांना उपलब्ध झाली आहे. यासाठी इंडिया स्किल्स कॉम्पिटिशन 2026-27 च्या अंतर्गत जिल्हास्तरीय स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. इच्छुकांनी https://www.skillindiadigital.gov.in या संकेतस्थळावर त्वरित नोंदणी करून आपला सहभाग निश्चित करावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, बीड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणारे उमेदवार राष्ट्रीय प्रक्रियेतून पुढे जाऊन जागतिक स्तरावर देशाचे नाव उज्ज्वल करू शकतील.या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी वयोमर्यादा हा मुख्य निकष आहे. 56 विविध कौशल्य क्षेत्रांसाठी उमेदवाराचा जन्म 1 जानेवारी 2003 किंवा त्यानंतरचा असावा. तसेच सायबर सिक्युरिटी, इंडस्ट्री 4.0 आणि मेकाट्रॉनिक्स यांसारख्या टीम स्किल्ससाठी उमेदवाराचा जन्म 1 जानेवारी 2003 नंतरचा, तर स्वायत्त मोबाईल रोबोटिक्स आणि लँडस्केप गार्डनिंगसाठी 1 जानेवारी 2006 किंवा त्यानंतरचा असणे अनिवार्य आहे. सर्व शासकीय व खाजगी आयटीआय, अभियांत्रिकी व पॉलिटेक्निक महाविद्यालये, एमएसएमई टूल रूम्स आणि इतर शैक्षणिक संस्थांमधील पात्र तरुणांनी यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. असेही कळविले आहे.

## जंतर-मंतरवरील लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ अंबाजोगाईतील वकिल आक्रमक; महामहिम राष्ट्रपतींना उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत निवेदन

**अंबाजोगाई :** दिल्लीतील जंतर-मंतर येथे शांततामय मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर आणि ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ मा. सोनम वांगचुक यांच्या उपोषणस्थळी पोलिसांनी केलेल्या अमानुष लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ 'संविधान प्रेमी विधिज्ञ वकील संघ, अंबाजोगाई'च्या वतीने तीव्र संताप व्यक्त करण्यात आला आहे. या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करावी आणि दोषींवर कडक कारवाई करावी, या मुख्य मागणीचे निवेदन महामहिम राष्ट्रपती यांच्या नावे अंबाजोगाईच्या उप-विभागीय अधिकाऱ्यांमार्फत सादर करण्यात आले.



देशात सातत्याने होणाऱ्या पेपरफुटीमुळे हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला लागले असून, नैराश्यातून अनेक तरुणांना टोकाचे पाऊल उचलावे लागले आहे. यावर आळा घालण्यासाठी, शैक्षणिक सुधारणांसाठी आणि केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यासाठी दिल्लीतील जंतर-मंतरवर विद्यार्थ्यांनी अहिंसक मार्गाने आंदोलन छेडले होते. या आंदोलनाला पाठिंबा देत ख्यातनाम शास्त्रज्ञ व पर्यावरणवादी सोनम वांगचुक यांनीही बेमुदत उपोषण सुरू केले होते.

सुरू केले होते.

मात्र, दि. २६ जून रोजी शांततामय मार्गाने मोर्चा काढणाऱ्या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी बेछूट लाठीमार केला. या हिंसक हल्ल्यात अनेक तरुण-तरुणी रक्तबंबाळ झाले असून काहींचे हात-पाय मोडल्याच्या गंभीर घटना घडल्या आहेत. लोकशाही मार्गाने आवाज उठवणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या या हल्ल्याचा देशभरातून निषेध होत आहे.

निवेदनातील प्रमुख मागण्या

जंतर-मंतरवर विद्यार्थी आणि आंदोलनकर्त्यांवर झालेल्या लाठीहल्ल्याची निष्पक्ष व उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

देशातील वाढत्या पेपरफुटीची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा.

भविष्यात विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी भारतीय शिक्षण व्यवस्थेत पारदर्शक आणि व्यापक सुधारणा तातडीने लागू कराव्यात.

कायद्याचे अभ्यासक आणि संविधानाचे रक्षक म्हणून या अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे आमचे कर्तव्य असल्याचे सांगत, महामहिम राष्ट्रपतींनी या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी 'संविधान प्रेमी विधिज्ञ वकील संघ, अंबाजोगाई'च्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे. निवेदनावर ॲडअजय बुरांडे,ॲड बाबुराव तिडके, ॲड माणिक आदमाने,ॲड माधव जाधव,ॲड इस्माईल गवळी,ॲड विलास लोखंडे, ॲड शिवाजी कांबळे, ॲड विजय चव्हाण, ॲड दिलीप गोरे, ॲड सचिन शेप यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

## रुद्रम प्रोॲक्टिव्ह अबॅकस, बर्दापूरच्या 24 पैकी 24 विद्यार्थ्यांचे शंभर टक्के यश

**अंबाजोगाई :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची जिद्द, मेहनत आणि गुणवत्ता राष्ट्रीय स्तरावरही तितकीच सक्षम असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. दि. *२१ जुलै २०२६* रोजी बीड येथे आयोजित *प्रोॲक्टिव्ह अबॅकस नॅशनल कॉम्पिटिशन समर–२०२६* या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत *रुद्रम प्रोॲक्टिव्ह अबॅकस, बर्दापूरच्या विद्यार्थ्यांनी अभूतपूर्व यश संपादन करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. संस्थेचे **एकूण २४ विद्यार्थी* स्पर्धेत सहभागी झाले होते आणि विशेष म्हणजे *सर्व २४ विद्यार्थ्यांनी विविध गटांत मानाचे पुरस्कार पटकावत शंभर टक्के यशाची नोंद* केली.

राष्ट्रीय स्तरावरील या स्पर्धेत मानसिक गणितातील वेग, अचूकता, एकाग्रता, स्मरणशक्ती आणि आत्मविश्वासाची कसोटी लागली. देशभरातून आलेल्या स्पर्धकांमध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी प्रथम, द्वितीय, तृतीय तसेच *बेस्ट परफॉर्मन्स अवॉर्ड* मिळवत बर्दापूरसह बीड जिल्ह्याचा गौरव वाढविला.

*पुरस्कार विजेते विद्यार्थी*

***प्रथम क्रमांक :*** अनुष्का मुंडे, रुद्रम जाधव, सायली नेमाने, अमित मोरे, श्रद्धा देवकते, श्रावणी वेदपाठक, सीमा शेख.

***द्वितीय क्रमांक :*** आनंदी लोमटे, स्वरा मोरे, श्रवण माने, आरुष मिसाळ, आवेज शेख.



***तृतीय क्रमांक :*** यश माने, ईश्वरी भोसले, श्रीनिवास जानकर, स्वरूप कांबळे, काव्यांजली हारे.

***बेस्ट परफॉर्मन्स अवॉर्ड :*** शौर्य जाधव, आर्य वेदपाठक, कुणाल सिरसाट, किशोरी सिरसाट, सिद्धांत पत्रे, अपेक्षा सूर्यवंशी, शानवाज देशमुख.

या यशामागे विद्यार्थ्यांचा सातत्यपूर्ण सराव, पालकांचे मोलाचे सहकार्य आणि *रुद्रम प्रोॲक्टिव्ह अबॅकस, बर्दापूरच्या संचालिका **सौ. संध्याराणी मधुकर जाधव* यांचे दर्जेदार प्रशिक्षण व वैयक्तिक मार्गदर्शन हे महत्त्वाचे घटक ठरले. या यशाबद्दल संबंधित शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, पालक व नागरिकांनी विद्यार्थ्यांचे आणि संस्थेचे अभिनंदन केले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असून, *रुद्रम प्रोॲक्टिव्ह अबॅकस, बर्दापूर*ने गुणवत्तापूर्ण प्रशिक्षणाच्या बळावर राष्ट्रीय पातळीवर आपला ठसा उमटविल्याची भावना सर्व स्तरांतून व्यक्त करण्यात येत आहे.

जा.क्र.जि.ग्रा.आ./बीड/ १३५९
जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,
बीड. जिल्हा कार्यालय : शाहूनगर,
पांगरी रोड, बीड-४३११२२
दिनांक: २१ जुलै २०२६

**DISTRICT CONSUMER DISPUTES REDRESSAL COMMSSION BEED**

**Under the Consumer Protection Act, 2019**

Telephone No.: 02442-230501 Email: confo-bi-mh@nic.in Website:
HOUSE NO.1-4-1600, UTTAMNANDA BUILDING, IST FLOOR, AMBIKA CHOWK, PANGRI ROAD, SHAHU NAGAR DISTRICT BEED MAHARASHTRA

CONSUMER CASE NO. DC/470/CC/182/2024

RAJENDRA S/O. SUKHADEORAO GAIKWAD....Petitioner/Appellant

Versus

JIJAU MASAHEB MULTISTATE CO-OP. CREDIT SOCIETY LTD. BEED MAIN BRANCH RAJIV GANDHI CHOWK PRESIDENT, ANITA W/O. BABAN SHINDE. .....Opposite Party/ Respondent(s)

To,

Opposite Party / Respondent Name:

1. ASHWINI W/O SUNIL WANDHARE, MUKHY PRAMBHADAK, JIJAU MA SAHEB MULTI STATE CO-OP. CREDIT SOCIETY LTD. BEED. MAIN BRANCH RAJIV GANDHI CHOWK BEED. R/O RAJIV GHANDHI CHOWK CANOL ROAD BEED., MAHARASHTRA BEED- 2. YOGESH S/O NAVNATHRAO KARANDE, SANCHALK, JIJAU MASAHEB MULTISTATE CO-OP. CREDIT SOCIETY LTD BEED. R/O RAJIV GHANDHI CHOWK CANOL ROAD BEED., MAHARASHTRA BEED- 3. BABAN S/O WISHWANATH SHINDE SANCHALK, JIJAU MA SAHEB MULTI STATE CO-OP. CREDIT SOCIETY LTD. BEED. MAIN BRANCH RAJIV GANDHI CHOWK BEED. R/O RAJIV GHANDHI CHOWK CANOL ROAD BEED., MAHARASHTRA BEED-

**जाहिर प्रगटन**

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक ०२/०९/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फ उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.
मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड
यांची आदेशानुसार.
दिनांक २०/०७/२०२६

प्रबंधक
ठिकाण - बीड
जिल्हा ग्राहक तक्रार,
निवारण आयोग, बीड

**विशेष वसुली अधिकारी, अंबाजोगाई यांचे कार्यालय,**
द्वारा दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई,
मुख्य कार्यालय,परळी-रोड, अंबाजोगाई-४३१ ५१७
जा.क्र/ दीन /वि.वसुली /७०१६-२८/**१०७**/२०२६-२७.
दिनांक :- २२.०७.२०२६

[नियम १०७ पोट-नियम (११ (ड-११) पहा)]

**स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस**

ज्या अर्थी खाली सही केलेला वसुली अधिकारी श्री.अनंत गोपाळराव देशपांडे, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम,१९६१ अन्वये असून **१४.१२.२०२२** रोजी मागणीची नोटीस ऋणको **श्री. रत्नाकर अंबादासराव देशमुख** यांना देऊन नोटीशीमध्ये नमूद केलेली रक्कम रु.२,३३,९५,५३९/- (अक्षरी- दोन कोटी तेहतिस लाख पंच्यानव्व हजार पाचशे एकोणचाळीस रु.) सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून आणि ऋणको याने रक्कम जमा करण्यास कसूर केली आहे.

खाली सही करणाऱ्याने दिनांक २१.०२.२०२३ रोजी जप्तीची नोटीस दिली असून, पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

ऋणकोणे रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे, ऋणकोला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे आणि सर्व नागरिकांना,खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्याला/तिला महाराष्ट्र सहकारी संस्था नियम,१९६१ मधिल नियम १०७ ११(ड-१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार या दिनांक २२.०७.२०२६ दिवशी सन २०२६-२७ वर्षी ताबा घेतला आहे.

विशेष करून ऋणकोला आणि नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे की, मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यासविशेष वसुली अधिकारी, दीनदयाळ नागरी सहकारी बँक म.अंबाजोगाई यांच्या बोजाची खाते क्र.४-७०१६-२८ रक्कम रु.४,५२,९५,६६५/- (चार कोटी बावन्न लाख पंच्यानव्व हजार साहशे पासाष्ट रु.) अधिक दिनांक ०१.०७.२०२६ पासुन त्यावरील व्याज याला अधीन रहावे लागेल.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

श्री. रत्नाकर अंबादास देशमुख यांच्या कर्ज प्रकरणात श्री. दिलीप विठ्ठल जाधव यांची मौजे मांडाखळी ता.जि. परभणी येथील गट क्र.३४५ क्षेत्र ८० आर. ज्याची चतु:सिमा खालीलप्रमाणे:-

**पुर्व :- नाला**
**पश्चिम :- यशवंत जाधव यांची जमीन**
**दक्षिण :- मुरलीधर जाधव यांची जमीन**
**उत्तर :- गुलाब यांची जमीन**

**दिनांक:-** २२.०७.२०२६
**स्थळ:-** मौजे मांडाखळी ता.जि. परभणी

**विशेष वसुली अधिकारी**

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# आषाढी वारी भक्ती, समता आणि विठ्ठलनामाचा अखंड सोहळा

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचा अविभाज्य भाग असलेली पंढरपूर आषाढी वारी म्हणजे भक्ती, समर्पण आणि मानवतेचा उत्सव होय. कित्तेक वर्षांपासून लाखो वारकरी "ज्ञानोबा-तुकाराम" चा जयघोष करत पंढरपूरच्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिराकडे पायी मार्गक्रमण करतात.

माझे आई वडील हे देखील विठ्ठलभक्त आहेत. वर्षभर आपल्या शेतात काबाड कष्ट करून संसाराचा गाढा हाकायचा आणि आषाढी वारीत आळंदी ते पंढरपूर पायी चालत वारी करायची. कांही वेळा दोघेही आणि कांही अडचण असल्यास एकाने का होईना वारीत जाणे हि परंपराच होती. आत्ता वयोमानाने दोघांना हि वारीत जाता येत नाही तरी घरी नित्यनियमाने हरिपाठ, नामस्मरण सुरू असते. त्यांच्या प्रत्येक स्वासात विठ्ठल नाम असते. आज वयाच्या नव्वदी पार केली तरी विठ्ठल कृपेने प्रकृती उत्तम आहे.

यंदा आषाढी एकादशी निमित्तानेही संपूर्ण महाराष्ट्र विठ्ठलनामाच्या गजराने दुमदुमून गेला. प्रत्येक वारकऱ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद,ओठांवरील अभंग आणि हृदयातील विठ्ठलभक्ती प्रत्येकाला अध्यात्माचा अनोखा अनुभव देऊन जात आहे.

वारकऱ्याची वारी ही केवळ धार्मिक यात्रा नसून ती समता, बंधुभाव, शिस्त, सेवा आणि समाजप्रबोधनाचा संदेश देणारी जीवनशाळा आहे. संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, संत नामदेव, संत एकनाथ, संत जनाबाई, संत चोखामेळा यांसारख्या संतांनी रुजविलेल्या वारकरी संप्रदायाचा हा अखंड प्रवाह आजही तेवढ्याच श्रद्धेने सुरू आहे. जाती-पाती, श्रीमंती-गरिबी, स्त्री-पुरुष असा कोणताही भेदभाव न करता प्रत्येक वारकरी "माऊली" म्हणून एकमेकांना संबोधतो. हीच वारीची खरी ताकद आहे.

वारकऱ्यांची विठ्ठलाप्रती असलेली निस्सीम भक्ती शब्दांत मांडणे कठीण आहे. अनेक वारकरी वर्षभर आषाढी वारीची आतुरतेने वाट पाहत असतात. डोक्यावर तुळशीवृंदावन, हातात टाळ, खांद्यावर भगवी पताका आणि मुखी



अखंड "विठ्ठल... विठ्ठल..." चा गजर करत ते शेकडो किलोमीटरचा प्रवास आनंदाने पूर्ण करतात. उन्हाचा तडाखा, पाऊस, थकवा किंवा इतर अडचणी त्यांना कधीही परावृत्त करू शकत नाहीत. कारण त्यांच्या मनात एकच ध्यास असतो—पंढरीच्या विठुरायाचे दर्शन.

"पंढरीची वारी, आहे माझे घरी" ही भावना प्रत्येक वारकऱ्याच्या जीवनात खोलवर रुजलेली असते. विठ्ठल भेटीची ओढ त्यांना सर्व दुःख विसरायला लावते. चंद्रभागेच्या तीरावर पोहोचल्यावर आणि विठ्ठलाच्या चरणी माथा टेकवल्यावर त्यांना मिळणारे समाधान हे कोणत्याही भौतिक सुखापेक्षा श्रेष्ठ असते. विटेवर उभा असलेला करुणामूर्ती विठ्ठल हा त्यांच्या श्रद्धेचा, आशेचा आणि जीवनाचा आधार बनतो.

वारीतील दिंडी प्रवास हा शिस्त, संघटन आणि सहकार्याचा आदर्श मानला जातो. प्रत्येक दिंडीचे निश्चित वेळापत्रक, मुक्काम, भोजन, भजन-कीर्तन आणि सेवा यांचे अत्यंत नियोजनबद्ध व्यवस्थापन केले जाते. पहाटे काकड आरतीने दिवसाची सुरुवात होते. त्यानंतर अभंग, हरिपाठ, नामस्मरण आणि भजनाच्या तालावर वारकरी पुढील प्रवासाला निघतात. प्रवासादरम्यान अनेक गावांतील नागरिक वारकऱ्यांचे पाणी, अन्न, वैद्यकीय सेवा आणि निवासाची निःस्वार्थ व्यवस्था करतात. ही सेवाभावाची परंपरा महाराष्ट्राच्या संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे .

यंदाच्या वारीमध्ये सहभागी होणाऱ्या तरुणांची संख्या वाढत असल्याचे यंदाही दिसून आले. आधुनिक तंत्रज्ञान सोशल मीडियाच्या जमान्यात हि तरुण पिढी संतांच्या विचारांकडे आकर्षित होत आहे, ही समाधानाची बाब आहे. दिंडीत पर्यावरण,संवर्धन, स्वच्छता, जलसंधारण, व्यसनमुक्ती, वृक्षारोपण आणि सामाजिक ऐक्याचे संदेशही प्रत्येक दिंडींमधून दिले जातात. त्यामुळे वारी ही केवळ भक्तीची परंपरा न राहता समाजजागृतीचे प्रभावी माध्यम असल्याचे दिसून येते.

पंढरपूरमध्ये आषाढी एकादशीच्या दिवशी लाखो भाविकांच्या उपस्थितीमुळे विठ्ठलमय वातावरण निर्माण होते. चंद्रभागा नदीचा घाट, विठ्ठल मंदिर परिसर, दिंड्यांचा गजर, टाळ-मृदंगाचा निनाद आणि अभंगांने संपूर्ण पंढरपूर भक्तिरसात न्हाऊन निघते. "ज्ञानोबा-तुकाराम" चा जयघोष आणि "पुंडलिक वरदा हरी विठ्ठल" चा अखंड निनाद प्रत्येक वारकऱ्या मध्ये मना मनात नवचैतन्य निर्माण करतो.

आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनात वारी आपल्याला संयम, प्रेम, सहकार्य, समता आणि ईश्वरभक्तीची शिकवण देते. प्रत्येकाने दुसऱ्याचा आदर करावा, निस्वार्थ सेवा करावी आणि समाजात बंधुभाव वाढवावा, हा संदेश वारीतून मिळतो. म्हणूनच वारी ही महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख, संतपरंपरेचा अमूल्य वारसा आणि भक्तीचा अखंड महोत्सव आहे.

यंदाच्या आषाढी वारी ने पुन्हा एकदा सिद्ध केले की, काळ बदलला, साधने बदलली, जीवनशैली बदलली; परंतु विठ्ठलभक्तांची श्रद्धा, विठ्ठल भेटीची ओढ आणि वारकरी संप्रदायाची परंपरा आजही तितकीच जिवंत आहे. विठ्ठलाच्या चरणी अर्पण केलेली ही भक्ती पुढील अनेक पिढ्यांनाही प्रेरणा देत राहील. "विठ्ठल... विठ्ठल..." या नामस्मरणातच जीवनाचे खरे समाधान आणि मानवतेचे खरे तत्त्व दडले आहे.

- मस्के राजाराम

## अंधश्रद्धेला विज्ञानाची जोड देत जनजागृती; निबंध स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव



तभा वृत्तसेवा

कन्नड, दि. २४ जुलै - सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत समाजकल्याण सहाय्यक आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर तथा एकता बहुउद्देशीय महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२४ रोजी अंधश्रद्धा निर्मूलन व जादूटोणाविरोधी कायद्याचा प्रचार व प्रसार करण्यासाठी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन छत्रपती शिवाजी महाविद्यालय, कन्नड येथे करण्यात आले. विज्ञाननिष्ठ विचारांचा स्वीकार करून अंधश्रद्धेपासून दूर राहण्याचा संदेश यावेळी विद्यार्थ्यांना देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य विजय भोसले होते. प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस उपनिरीक्षक गाडेकर, तर प्रमुख वक्ते म्हणून विक्रांत करेवार व भाऊसाहेब पठाडे उपस्थित होते.

यावेळी आयोजित निबंध स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके व प्रशस्तीपत्रे देऊन गौरविण्यात आले. यात प्रतीक्षा योगेश जाधव (स्व. के. के. जाधव सर विद्यालय), आदित्य शरद धुमाळ (संत ज्ञानेश्वर विद्यालय), सिद्धी ज्ञानेश्वर हिवाळे (साने गुरुजी विद्यालय), लावण्या मनोज गिरी (आजूबाई विद्यालय) आणि सिद्धी भगवान देवरे (सावित्रीबाई फुले विद्यालय) या विद्यार्थ्यांचा समावेश होता.

प्रमुख वक्ते विक्रांत करेवार यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन, विवेकनिष्ठ विचार आणि सामाजिक जबाबदारी याविषयी मार्गदर्शन केले. तर भाऊसाहेब पठाडे यांनी विज्ञानातील विविध प्रयोग व प्रात्यक्षिकांद्वारे अंधश्रद्धेचे खंडन करत विद्यार्थ्यांनी कोणत्याही गोष्टीकडे चिकित्सक आणि वैज्ञानिक दृष्टीने पाहण्याची गरज असल्याचे प्रभावीपणे पटवून दिले. त्यांच्या प्रात्यक्षिकांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाजकल्याण अधिकारी आशा लखाडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रवीण दाभाडे यांनी केले, तर आभार वृषाली खंडागळे यांनी मानले.

## बाबरा येथे महारक्तदान शिबिर व वृक्षारोपण; 29 जणांचे रक्तदान

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** फुलंब्री तालुक्यातील बाबरा येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त, माजी उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त तसेच भाजप जिल्हाध्यक्ष तथा आमदार सुहास शिरसाठ यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भारतीय जनता पक्ष, वडोदबाजार मंडळाच्या वतीने महारक्तदान शिबिर व वृक्षारोपण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या सामाजिक उपक्रमात २९ रक्तदात्यांनी रक्तदान करून समाजाप्रती आपली बांधिलकी



जपली.

यावेळी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षारोपणही करण्यात आले. कार्यक्रमात बोलताना जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष जितेंद्र जैस्वाल यांनी आगामी काळात परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करून त्यांचे संगोपन करण्याचा संकल्प व्यक्त केला.

या कार्यक्रमास आमदार अनुराधा चव्हाण, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष जितेंद्र जैस्वाल, जिल्हा परिषद सदस्य गोपाल वाघ, फुलंब्री पंचायत समितीचे सभापती सर्जेराव पाटील मेटे, माजी जिल्हा परिषद सदस्य शिवाजी महाराज पाथ्रीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी अजिनाथ सोनवणे, अभिलाष सोनवणे, सोमीनाथ सोनवणे, जगन दाढे, ज्ञानेश्वर चोपडे, माधवराव जाधव, रवी पवार, कैलास गायके, सुनील तायडे, राजू पांडे, प्रकाश पायगव्हाण, संजय त्रिभुवन, डॉ. मिनाजोद्दीन शेख, धनंजय महाजन, प्रवीण वाघ, शिवाजी मैंद, संदीप बनसोड, अनिल काळे, अंबादास काथार, रामेश्वर खंडेलवाल, संतोष तारु, आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण उगले, डॉ. सीमा हाके यांच्यासह भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण



छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी - चिते पिंपळगाव शाखेत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री माननीय देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त बँकेचे माननीय उपाध्यक्ष रामू काका शेळके यांच्या शुभहस्ते वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला.

याप्रसंगी बँकेचे माजी उपाध्यक्ष दामू अण्णा नवपुते, चित्ते पिंपळगाव परिसरातील सर्व सहकारी संस्थांचे अध्यक्ष, सचिव मान्यवर उपस्थित होते. राम राखे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. कुंदे यांनी प्रास्ताविक केले. लोन ऑफिसर दादाराव चौधरी यांनी आभार प्रदर्शन केले.

## पैठण-आपेगाव विकास प्राधिकरणाच्या विविध विकासकामांचा आढावा बैठक संपन्न

तभा वृत्तसेवा

**पैठण दि २४ :-** पैठण विधानसभा मतदारसंघातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व पैठण-आपेगाव विकास प्राधिकरणाच्या विविध विकासकामांचा आढावा घेण्यासाठी आमदार विलास बाप्पू भुमरे, जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे आढावा बैठक पार पडली.

बैठकीत सुरू असलेल्या प्रकल्पांच्या प्रगतीचे परीक्षण करताना प्रलंबित कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. नागरिकांना दर्जेदार व अखंड पाणीपुरवठा तसेच मूलभूत सुविधा प्रभावीपणे उपलब्ध व्हाव्यात, यासाठी आवश्यक उपाययोजनांवरही चर्चा झाली.

विकासकामांमध्ये गुणवत्ता, पारदर्शकता आणि वेळेचे नियोजन यांना प्राधान्य देत संबंधित विभागांमध्ये समन्वय वाढवण्यावर भर देण्यात आला. पैठणच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासनाची ही सकारात्मक पावले निश्चितच नागरिकांच्या हिताची ठरणार आहेत.

पैठण शहरातील एसटीपी (STP) प्रकल्प, ड्रेनेज लाईन व सांडपाणी व्यवस्थापनाची सद्यस्थिती काय आहे? उर्वरित कामे कधी पूर्ण होणार?,महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांतर्गत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनांची प्रगती, निधी व प्रलंबित कामांचा सविस्तर आढावा. पैठण नगर परिषद हद्दवाढ प्रस्तावाची सद्यस्थिती, आवश्यक प्रशासकीय कार्यवाही व पुढील प्रक्रिया.पैठण-आपेगाव विकास प्राधिकरणांतर्गत टप्पा क्रमांक ३ विकासकामांची प्रगती आणि प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत सूचना.पुरातत्त्व विभागाच्या अखत्यारीतील बारव, प्राचीन मंदिरे व ऐतिहासिक वारसा स्थळांचे संवर्धन, दुरुस्ती आणि पर्यटन विकासासाठी आवश्यक उपाययोजना,कै. बाळासाहेब पाटील वस्तुसंग्रहालयाच्या विस्तारीकरणाचा प्रस्ताव, निधी उपलब्धता व कामाची अंमलबजावणी.

सर्व विभागांनी परस्पर समन्वय ठेवून गुणवत्तापूर्ण, वेळेत आणि नियोजनबद्ध पद्धतीने विकासकामे पूर्ण करण्याबाबत निर्देश दिल्याची माहिती आमदार भुमरे यांनी दिली.

## 'द्विधा'मधून निमिष कुलकर्णींचे मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण



तभा वृत्तसेवा

**मुंबई :** 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'मधून लोकप्रिय झालेला अभिनेता निमिष कुलकर्णी आगामी 'द्विधा' या चित्रपटातून प्रथमच मराठी रुपेरी पडद्यावर झळकणार आहे. २१ ऑगस्ट रोजी प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटात तो 'आदित्य (आदि)' ही प्रेमळ, समंजस आणि कुटुंबाला एकत्र ठेवणाऱ्या तरुणाची भूमिका साकारत आहे. बाप-लेकीच्या नात्यातील भावविश्व उलगडणाऱ्या या चित्रपटाचे लेखन-दिग्दर्शन निलेश भास्कर नाईक यांनी केले असून निर्माती विदुला रमेश आजगावकर आहेत. चित्रपटात सतीश पुळेकर, मानसी कुलकर्णी, आस्ताद काळे, तन्वी कुलकर्णी, भूषण कडू आदी कलाकारांच्या प्रमुख भूमिका आहेत.

## सोयगावच्या इतिहासातील सर्वात मोठ्या जनआरोग्य शिबिराला विक्रमी प्रतिसाद

### 2,000 रुग्णांची तपासणी,68 गंभीर रुग्ण उपचारासाठी संदर्भित,600 चष्म्यांचे,568 चालण्याच्या काठ्यांचे व 500 आयड्रॉपचे मोफत वाटप

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२४ जुलै

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त टीम समर्पण फाउंडेशन आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष यांच्या समन्वयाने दि.२२ बुधवार रोजी ग्रामीण रुग्णालय सोयगाव येथे मुख्यमंत्री जनआरोग्य शिबिराचे भव्य आयोजन करण्यात आले.

समर्पण फाउंडेशन च्या टीम च्या सदस्यांनी वर्गणी करून स्वखर्चाने हा आरोग्याचा महायज्ञ सोयगाव शहरात घडवून आणल्या बद्दल याचे सर्वत्र कौतुक होत आहे

या शिबिरामध्ये मेडिसिन,जनरल सर्जरी,कर्करोग,हृदयरोग, नेत्ररोग,अस्थिरोग, स्त्रीरोग,कान-नाक-घसा,दंतरोग,बालरोग आदी विविध शाखांतील तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांची मोफत तपासणी करून आवश्यक उपचार व मार्गदर्शन केले. सोयगाव परिसरातील गावांमधून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिबिराचा लाभ घेतला. शिबिरामध्ये एकूण २००० रुग्णांची तपासणी करण्यात



आली.यापैकी ६८ गंभीर रुग्णांना पुढील उपचारासाठी विविध विशेष रुग्णालयांकडे संदर्भित करण्यात आले.तसेच गरजूंना ६०० चष्म्यांचे,५६८ चालण्याच्या काठ्यांचे आणि ५०० आयड्रॉपचे मोफत वाटप करण्यात आले.

याशिवाय २७ रुग्णांना सलाईन,११२ रक्त तपासण्या आणि ८६ ईसीजी तपासण्या करण्यात आल्या.तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनामुळे अनेक रुग्णांना वेळेत पुढील उपचाराची दिशा मिळाली.

या महत्त्वाकांक्षी जनआरोग्य उपक्रमात ग्रामीण रुग्णालय सोयगाव,रूबी स्टार रुग्णालय (जामनेर), शासकीय कर्करोग रुग्णालय,छत्रपती संभाजीनगर, मराठवाडा कॅन्सर रुग्णालय,जे.जे.प्लस रुग्णालय,ओरियन सिटिकेअर रुग्णालय,सेंचुरी रुग्णालय,सेठ नंदलाल धूत रुग्णालय,डॉ.हेडगेवार रुग्णालय तसेच कर्णावत कर्करोग रुग्णालय आणि संतपुरे रुग्णालय यांनी सक्रिय सहभाग नोंदवून तज्ज्ञ वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिल्या.

समाजातील प्रत्येक गरजू नागरिकापर्यंत दर्जेदार आरोग्यसेवा पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व तज्ज्ञ डॉक्टर, सहभागी रुग्णालये,आरोग्य विभाग,स्वयंसेवक,सहकार्य करणाऱ्या संस्था तसेच उपस्थित नागरिकांचे समर्पण फाउंडेशन आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष यांच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

## सौ. उमा सौरभ साबणे यांचे MPSC परीक्षेत घवघवीत यश; 'औषध निरीक्षक' पदी निवड



तभा वृत्तसेवा

**गंगापूर दि.२४:** महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) मार्फत घेण्यात आलेल्या औषध निरीक्षक (Drug Inspector) वर्ग-२ परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, या परीक्षेत सौ. उमा सौरभ साबणे यांनी पहिल्याच प्रयत्नात घवघवीत यश संपादन करत औषध निरीक्षक पदावर निवड मिळवली आहे.

सौ. उमा साबणे यांचे शालेय शिक्षण नांदगाव येथे झाले असून, त्यांनी नाशिक येथून एम.फार्म (M.Pharm) पदवी प्राप्त केली आहे. त्या ॲड. प्रदीप साबणे यांच्या सून आहेत. स्पर्धा परीक्षेच्या तयारीदरम्यान त्यांनी यापूर्वी वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय (DMER) मार्फत घेण्यात आलेली फार्मसी ऑफिसर (औषध निर्माण अधिकारी) ही परीक्षाही यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली होती. गेल्या वर्षभरापासून त्यांनी अत्यंत चिकाटी, सातत्य आणि कठोर परिश्रमाच्या बळावर MPSC परीक्षेची तयारी केली. त्यांच्या अथक मेहनतीला आणि दृढनिश्चयाला यशाचे फळ मिळाले असून, पहिल्याच प्रयत्नात औषध निरीक्षक पदावर निवड होणे ही त्यांच्या कर्तृत्वाची पावती आहे. सौ. उमा सौरभ साबणे यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या या यशामुळे स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना निश्चितच प्रेरणा मिळणार आहे.

## आषाढी वारीचा भक्तिमय सोहळा आता घरबसल्या!

छत्रपती संभाजीनगर - आषाढी वारी म्हणजे विठ्ठलभक्ती, नामस्मरण आणि अध्यात्माचा अखंड उत्सव. लाखो वारकरी पंढरपूरच्या दिशेने विठ्ठलनामाचा गजर करत मार्गक्रमण करतात. या भक्तिमय वातावरणाचा आनंद प्रत्येक घरापर्यंत पोहोचवण्यासाठी झी टॉकीजने खास आषाढी सोहळ्याचे आयोजन केले असून, त्याअंतर्गत ‘गजर कीर्तनाचा सोहळा आनंदाचा’ हा विशेष कार्यक्रम दररोज सकाळी ७.३० वाजता प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

## वडाळी येथील अविनाश दिंगबर भोसले यांचे निधन

तभा वृत्तसेवा



कन्नड - दि. २४ जुलै - कन्नड तालुक्यातील वडाळी येथील रहिवासी अविनाश दिंगबर भोसले (वय ४१) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने वडाळी गावासह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा, आई-वडील, भाऊ असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर वडाळी येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या अकाली निधनाबद्दल विविध स्तरांतून शोक व्यक्त करण्यात येत आहे.

## एमजीएममध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेवरील अध्यापक विकास कार्यक्रमाचा शुभारंभ

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशन (एमजीएम) विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीत ‘आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड जनरेटिव्ह एआय फॉर इंडस्ट्रियल ॲप्लिकेशन्स’ या विषयावरील तीन दिवसीय अध्यापक विकास कार्यक्रमाचा गुरुवारी शुभारंभ झाला. हा कार्यक्रम SAEINDIA आणि ISHRAE छत्रपती संभाजीनगर यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला आहे.

उद्घाटनप्रसंगी कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, SAEINDIAचे अध्यक्ष प्रसाद कोकीळ, ISHRAEचे माजी अध्यक्ष राजेंद्र करमळकर, तज्ज्ञ अभ्यासक डॉ. अभिषेक पतंगे, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, संचालिका डॉ. परमिंदर कौर धिंग्रा यांच्यासह प्राध्यापक व विद्यार्थी



उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. सपकाळ यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, जनरेटिव्ह एआय आणि लार्ज लँग्वेज मॉडेल्समुळे शिक्षण व उद्योग क्षेत्रात मोठे परिवर्तन होत असल्याचे सांगत, प्राध्यापकांनी सातत्याने कौशल्यवृद्धी करणे ही काळाची गरज असल्याचे नमूद केले. प्रसाद कोकीळ यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे अध्यापनात नावीन्यपूर्ण प्रयोगांना चालना मिळाल्याचे सांगितले, तर राजेंद्र करमळकर यांनी उद्योगक्षेत्रातील प्रेडिक्टिव्ह मेंटेनन्स, डिझाइन आणि संशोधनासाठी एआयचे वाढते महत्त्व अधोरेखित केले.

कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर यांनी एमजीएम विद्यापीठ उद्योगाभिमुख आणि 'फ्युचर-रेडी' विद्यार्थी घडविण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर भर देत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संचालिका डॉ. परमिंदर कौर धिंग्रा यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. विकास लोकावार यांनी, तर आभार प्रा. जावेद सिद्दीकी यांनी मानले.


## पाहिजेत

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, हिंगोली संचलित

### शिवाजी महाविद्यालय, हिंगोली ता. जि. हिंगोली

प्रत्यक्ष मुलाखती

शिवाजी महाविद्यालयातील (अनुदानित) शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ करीता घडयाळी तासिका तत्वावर खालील विषयाचे पदे भरावयाची आहेत. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या नियमाप्रमाणे पात्र व अनुभवी तसेच इच्छुक उमेदवारांनी आपल्या आवश्यक त्या सर्व मुळ प्रमाणपत्रासह बायोडाटासह दिनांक २८/०७/२०२६ रोज मंगळवार सकाळी ११.०० वाजता शिवाजी महाविद्यालयात प्रत्यक्ष मुलाखतीस उपस्थित राहावे.

| अ.क्र. | विषय | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | उर्दू | ०१ | एम.ए.नेट/सेट पीएच.डी. | सहसंचालक उच्च शिक्षण, नांदेड यांचे ना-हरकत पत्र क्र.जा.क्र. JDNAN-NG-COANUH(HNGL)/४१/२०२६-Court (सुधारीत) दिनांक ०३/०७/२०२६ |
| २. | समाजशास्त्र | ०१ | एम.ए. नेट/सेट पीएच.डी. | |
| ३. | इतिहास | ०१ | एम.ए.नेट/सेट पीएच.डी. | |
| ४. | राज्यशास्त्र | ०१ | एम.ए.नेट/सेट पीएच.डी. | |
| ५. | अर्थशास्त्र | ०१ | एम.ए.नेट/सेट पीएच.डी. | |
| ६. | शा.शिक्षण | ०१ | एम.पी.एड/सेट पीएच.डी. | |
| ७. | लोकप्रशासन | ०१ | एम.ए.नेट/सेट पीएच.डी. | |
| ८. | तत्वज्ञान | ०१ | एम.ए.नेट/सेट पीएच.डी. | |
| | एकुण | ०८ | | |

कायम विनाअनुदानित मानधन तत्वावर शै. वर्ष २०२६-२७ करिता वाणिज्य शाखेसाठी खालील पदे भरणे आहे.

| अ.क्र. | विषय | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | वाणिज्य | ०२ | एम.कॉम. नेट/सेट पीएच.डी. | |

नोट :- नेट/सेट पीएच.डी. धारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास किमान आर्हता धारक उमेदवारांची नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात तासिका तत्वावर केली जाईल. वरील पदापैकी ५०% टक्के पद ही आरक्षणातुन भरली जातील. मुलाखतीस येताना उमेदवारांनी स्वतःच्या हस्ताक्षरातील अर्जाची प्रत सर्व प्रमाणपत्राच्या सत्यप्रतिसह मुलाखतीपुर्वी कार्यालयात दाखल करावीत व मुळ प्रमाणपत्रे मुलाखतीच्या वेळी सादर करावीत. मुलाखतीस येण्याऱ्या उमेदवारांना प्रवास व इतर भत्ता दिला जाणार नाही.

स्थळ
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

अध्यक्ष/सचिव
श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ हिंगोली

प्र-प्राचार्य
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

## अग्रलेख

# ...तशीच नोंद व्हावी

जंतर-मंतर मैदानावरील आंदोलनात गेल्या दोन-तीन दिवसांत जे काही घडले, त्यावरून ते प्रश्न सोडविण्याच्या प्रामाणिक उद्देशाने उभे राहिल्याचे वाटत असले, तरी काही प्रश्न निर्माण करणारे घटक तेथे आंदोलकांचा मुखवटा पांघरून वावरत असावेत, अशी शंका घेण्यास वाव आहे. परकीय शक्ती आणि भारतात अस्थिरता निर्माण करणारी तत्त्वे सक्रिय झाल्याची चर्चाही सुरू झाली आहे. राज्यघटनेने प्रत्येक नागरिकास आपल्या हक्कांसाठी संघर्ष करण्याचा, व्यवस्थेस जाब विचारण्याचा आणि न्याय मिळविण्यासाठी संघटित होण्याचा अधिकार दिलेला आहेच; त्यामुळे हे आंदोलन न्यायासाठीचा संघर्ष ठरले पाहिजे अशी अपेक्षा असताना, त्याआडून सुरू झालेल्या राजकारणाकडे आणि डावपेचांकडे सजगतेने पाहण्याची आवश्यकता आहे. अशा आंदोलनांत राजकारणाचा शिरकाव झाला, तर ती केवळ समस्यांचा संघर्ष न राहता राजकीय हेतूने प्रेरित नियोजनबद्ध मोहीम ठरते. समस्या सुटण्याऐवजी त्या जटिल होतातच; पण त्यामध्ये नव्या समस्यांचीही भर पडते, असे आसपासच्या देशांमध्ये घडलेल्या 'जेन-झी'च्या आंदोलनांतून व त्यानंतर घडलेल्या सत्तांतरातून उघड झालेले आहे. आता देशात सुरू असलेल्या या आंदोलनाच्या निमित्ताने, अन्य देशांतील सत्तापालटानंतरच्या परिस्थितीकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक ठरते.

जगभरातील तरुणाईच्या मनात खदखदत असलेले काही प्रश्न भारतातील तरुणांसमोर असून त्यांची दखल घेऊन तरुणांना प्रश्नमुक्तीचा प्रशस्त मार्ग दाखविण्याची गरज जंतर-मंतरवरील आंदोलनामुळे अधोरेखित झाली, हे नाकारता येत नाही. नव्या सहस्रकात जन्मलेली 'जेन-झी' पिढी समाजासमोरील समस्या, तरुण पिढीपुढील प्रश्न आणि सत्ताकारणाकडे जागरूकपणे पाहणारी शक्ती म्हणून ती उदयास येऊ लागली आहे. महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील बंधने, पर्यावरण, सामाजिक न्याय आदी अनेक प्रश्नांवर देशातील यंत्रणांना प्रश्न विचारण्याची ताकद या पिढीने प्राप्त केलेली आहे. आंदोलनाचा हेतू, आंदोलकांच्या मागण्या आणि त्यावरील उपाययोजना यांकडे गांभीर्याने पाहून त्यावर ठोस तोडगा काढण्याची गरज अधोरेखित झाली आहे. पण, त्याची दुसरी बाजूही तेवढीच महत्त्वाची आहे. अन्य काही देशांत जेन-झीच्या आंदोलनांनी तेथील प्रस्थापित सत्तांना हादरे दिले आणि काही ठिकाणी सत्तापालटही घडून आला. कोणतेही आंदोलन हे समस्या निर्माण करण्यासाठी नव्हे, तर सोडविण्यासाठी उभारले गेले तरच त्यास समाजाचा व्यापक पाठिंबा मिळत असतो. या अनुषंगाने अशा आंदोलनांचे जगातील वास्तव पाहिले तर उत्तर फारसे आशादायक नाही हेही लक्षात घेतले पाहिजे. अशा आंदोलनांनी सत्तापालट घडवून आणले हे खरे. पण ज्या असंतोषाच्या उद्रेकातून सत्तांतर घडले, त्या असंतोषाची कारणे दूर करणे अत्यंत कठीण झाले असल्याचे दिसते आहे. अशा आंदोलनांमधून प्रकट होणारा तरुणांचा असंतोष संपूर्ण आर्थिक-सामाजिक व्यवस्थेविरुद्ध असेल, तर तो समस्या सोडविण्यास साह्यभूत ठरतो. तो व्यक्तिविरोधी असेल तर मूळ मुद्याचाही संकोच होतो. व्यवस्था बदलण्यासाठी व्यक्तीविरुद्ध दिल्या जाणाऱ्या घोषणांपेक्षा, व्यापक संस्थात्मक सुधारणा आवश्यक असतात, हा अन्य देशांतील आंदोलनांनंतरच्या परिस्थितीने जगाला शिकविलेला धडा आहे. बांगला देशात विद्यार्थ्यांनी आणि तरुणांनी उभारलेल्या आरक्षणविरोधी व भ्रष्टाचारविरोधी आंदोलनाचे उदाहरण ताजे आहे. या आंदोलनानंतर सत्तेवर आलेल्या नव्या राज्यकर्त्यांनी डिजिटल स्वातंत्र्य, रोजगारनिर्मिती आणि शिक्षण सुधारणा यांची वारेमाप आश्वासने तरुणांना दिली. काही प्रमाणात पोलिस कारवाईवरील नियंत्रण, ऑनलाईन अभिव्यक्तीवरील निर्बंध कमी करणे आणि स्टार्टअप्सना प्रोत्साहन अशी पावले उचलली गेली. मात्र, या देशाची वस्त्रोद्योगावर अवलंबून असलेली अर्थव्यवस्था सत्तांतरानंतरही मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करू शकलेली नाही. श्रीलंकेतील स्थिती फारशी वेगळी नाही. चार वर्षांपूर्वी उभ्या जगाचे लक्ष या देशातील तरुणाईच्या आंदोलनाने वेधले होते. इंधन टंचाई, महागाई आणि आर्थिक संकटातून देश सावरण्याचे आलेल्या अपयशामुळे संतापलेल्या तरुणांनी राष्ट्राध्यक्षांना पदत्यागास भाग पाडले. ही आंदोलने जगाला एक नवी शिकवण देऊन गेली आहेत. ती म्हणजे, रस्त्यावरची क्रांती सरकार बदलू शकते; पण कर्जबाजारी अर्थव्यवस्था आणि निर्ढावलेली यंत्रणा यांमध्ये तातडीचे बदल घडविणे सोपे नसते. लोकांच्या अपेक्षा आणि त्या पूर्ण करणाऱ्या व्यवस्थेचा वेग यांमध्ये अंतर पडले, तर आंदोलनांतील आदर्शवाद आणि सत्तेतील व्यवहारवाद यांच्यात मोठा संघर्ष निर्माण होऊ शकतो. परिणामी तो सातत्यपूर्ण अस्थिरता निर्माण करण्यास कारणीभूतही ठरू शकतो, हे चिली नामक देशात जेन झीच्या आंदोलनानंतर घडलेल्या सत्तांतरावरून स्पष्ट झाले. त्या देशात शिक्षणावरील वारेमाप खर्च, आर्थिक विषमता आणि सामाजिक अन्यायाविरुद्ध उभ्या राहिलेल्या आंदोलनातूनच तरुण नेतृत्व सत्तेत आले. नव्या सरकारने किमान वेतनवाढ, सामाजिक सुरक्षा, महिलांचे अधिकार आणि पर्यावरणीय धोरणांवर भर दिला. पण आर्थिक मंदी, संसदीय विरोध आणि लोकांच्या अतिउच्च अपेक्षा यामुळे बदलांचा वेग कमी पडला. ट्युनिशिया, इजिप्त, लिबिया यांसारख्या देशांतही तरुणांनी सत्तेविरुद्ध उठाव केले, पण त्यानंतरही अनेक ठिकाणी लष्करी नियंत्रण, यादवी संघर्ष किंवा आर्थिक अस्थिरता कायमच राहिल्याने, व्यवस्थेविरुद्धचा असंतोष आणि अपेक्षाभंगाचे दुःख कायमच आहेत. आजच्या तरुणांचा असंतोष बहुआयामी आहे. त्यांना फक्त नोकरी नको. त्यांना सन्मान, मानसिक आरोग्य, स्वातंत्र्य, पर्यावरणीय सुरक्षा आणि गुणवत्तापूर्ण जीवन हवे आहे. पारंपरिक राजकारणाने ही अपेक्षा समजून घेतली, तर संवादाच्या मार्गाने अपेक्षित बदल घडणे अवघड नसते. मात्र, तसे न झाल्यास, कोणत्याही आंदोलनाचे भविष्यकालीन परिणाम दीर्घकाळ झेलावे लागतात. भारतात सुरू असलेल्या आंदोलनाच्या संयोजकांना याचे भान राखावे लागेल. सत्तापालटाच्या अपेक्षेने आंदोलनांचा राजकीय आखाडा घडवू पाहणाऱ्यांचे पाठबळ मिळविण्याऐवजी, संस्थात्मक बदलाचा व्यापक आराखडा तयार करण्याकरिता सामाजिक सहकार्याचा एल्गार आवश्यक आहे. असा आराखडाच संस्थात्मक पारदर्शकता वाढवू शकतो, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी यांमधील दुवा म्हणून काम करू शकतो आणि तरुणांना केवळ मतदार म्हणून नव्हे, तर धोरण निर्मितीचा भागीदार म्हणून सहभागी करून घेऊ शकतो. अन्यथा, अपरिपक्व असंतोषातून जन्माला येणारे जे काही असेल, ते देखील अपरिपक्व असते. सध्या केवळ एका परीक्षेतील कथित गैरव्यवहार एवढाच तरुणांमधील असंतोषाचा केंद्रबिंदू राहिलेला नाही.

ढासळती शिक्षण व्यवस्था, रोजगारांच्या संधी, स्पर्धा परीक्षा, व्यवस्थांवरील विश्वास आणि सामाजिक गतिशीलता असे अनेक व्यापक मुद्दे या निमित्ताने जोडले गेले आहेत. ज्या देशांत जेन झीची आंदोलने झाली, त्याहून भारताचे राजकीय आणि सामाजिक वास्तव वेगळे आहे. सरकारवर धोरणात्मक बदलांचा दबाव वाढविण्याचा विधायक मार्ग असेच आंदोलनाचे स्वरूप असावयास हवे. रस्त्यावर उतरून सत्तेला हादरा देण्यापेक्षा, सत्तेला कामाला लावण्यात हे आंदोलन यशस्वी झाले, तर भविष्यातील अस्थैर्याची भीती राहणार नाही आणि एका नव्या, पारदर्शक पर्वाचा शिल्पकार म्हणून तरुण पिढीच्या आंदोलनाची इतिहासात नोंद होईल. या आंदोलनाची नोंद तशीच व्हावी, हीच कुठल्याही राष्ट्रभक्ताची इच्छा असेल. अस्थिरतेच्या अनिष्ट परिणामांची पुनरुक्ती करण्याचे कारण नाही. ■

## अर्थविशेष

**ॲड. हितेश पारसे**

# एआयएसमध्ये आता परदेशी मालमत्तेची माहिती

आजच्या जागतिक युगात शिक्षण, नोकरी, व्यवसाय आणि गुंतवणुकीसाठी लाखो भारतीय नागरिक परदेशाशी आर्थिकदृष्ट्या जोडले गेले आहेत. अनेकांकडे अमेरिकेत, कॅनडा, यूके, ऑस्ट्रेलिया, दुबई किंवा सिंगापूरसारख्या देशांमध्ये बँक खाती, शेअर्स, म्युच्युअल फंड, निवृत्ती निधी किंवा स्थावर मालमत्ता आहे. काही जणांना परदेशातून पगार, व्याज, लाभांश किंवा भाडे उत्पन्न मिळते. यापूर्वी याची माहिती केवळ आयकर विभागाकडे उपलब्ध होती. आता आयकर विभागाने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून भारतीय करदात्यांच्या परदेशातील आर्थिक मालमत्ता, उत्पन्नाची माहिती त्यांच्या वार्षिक माहिती विवरणपत्रमध्ये दिसणार आहे. हा बदल केवळ तांत्रिक नाही, तर भारतीय करप्रणालीतील पारदर्शकतेच्या दिशेने टाकलेले एक मोठे पाऊल आहे.

**एआयएस म्हणजे नेमके काय? :** वार्षिक माहिती विवरणपत्र (एआयएस) म्हणजे करदात्याच्या आर्थिक व्यवहारांचा एक डिजिटल आरसा आहे. यामध्ये बँक व्याज, शेअर व्यवहार, म्युच्युअल फंड व्यवहार, टीडीएस, टीसीएस, मालमत्ता खरेदी-विक्री, उच्च मूल्याचे आर्थिक व्यवहार आदी माहिती याआधी दिसत होती. आता या यादीत परदेशातील आर्थिक माहितीची भर पडणार आहे.

**भारताला ही माहिती मिळते तरी कशी? :** अनेकांना प्रश्न पडतो की, 'मी परदेशात खाते उघडले, तर भारत सरकारला त्याची माहिती कशी मिळेल?' याचे उत्तर आहे माहितीची स्वयंचलित देवाणघेवाण. ही ओईसीडीच्या सामान्य अहवाल मानक अंतर्गत सुरू करण्यात आलेली आंतरराष्ट्रीय माहिती देवाणघेवाण प्रणाली आहे. आज १०० पेक्षा अधिक देश या व्यवस्थेत सहभागी आहेत. प्रत्येक सहभागी देश दरवर्षी आपल्या देशातील परदेशी नागरिकांच्या आर्थिक व्यवहारांची माहिती त्यांच्या मूळ देशाला पाठवतो. उदा. जर एखाद्या भारतीयाने अमेरिकेत खाते उघडले असेल तर अमेरिकेतील वित्तीय संस्था ती माहिती अमेरिकन कर प्राधिकरणाला देते; ती भारताच्या आयकर विभागाकडे पाठविली जाते.

एआयएसमध्ये खालील माहिती भारताला दिसण्याची शक्यता आहे- परदेशातील बँक खात्याचा तपशील, खात्यातील शिल्लक, व्याज उत्पन्न, लाभांश, शेअर्स व सिक्युरिटीजमधील गुंतवणूक, म्युच्युअल फंड, विमा पॉलिसी, आर्थिक मालमत्ता; काही परिस्थितीत स्थावर मालमत्तेची माहिती. आतापर्यंत ही माहिती आयकर विभागाकडे उपलब्ध असली तरी करदात्याला ती दिसत नव्हती. आता हीच माहिती एआयएसमध्ये उपलब्ध झाल्यामुळे करदाता स्वतः आधी तपासू शकेल आणि आवश्यक असल्यास दुरुस्तीही करू शकेल. ही बाब करदात्यांसाठी निश्चितच सकारात्मक आहे.

आयकर विभागाने माहिती अपलोड करण्यासाठी वेळापत्रक निश्चित केले आहे. २०२२ ते २०२४ या कालावधीतील माहिती ८ जुलै २०२६ पासून पुढील ९० दिवसांत एआयएसमध्ये उपलब्ध केली जाईल. २०२५ मधील माहिती प्राप्त झालेल्या महिन्याच्या अखेरीपासून ९० दिवसांच्या आत एआयएसमध्ये दिसेल. २०२६ पासून पुढे दरवर्षी माहिती प्राप्त झाल्यानंतर ९० दिवसांच्या आत ती एआयएसमध्ये उपलब्ध होईल.

आजपर्यंत अनेक करदाते असे समजत होते की, परदेशातील मालमत्ता भारताला कळणार नाही. परंतु आता आयकर विभागाकडे उपलब्ध असलेली माहिती आणि आपण आयकर विवरणपत्रात दिलेली माहिती यांची थेट तुलना होणार आहे. जर दोन्ही माहितीमध्ये तफावत आढळली तर करदात्याला स्पष्टीकरण द्यावे लागू शकते. म्हणूनच आता 'माहिती उघड करणे हेच सर्वोत्तम धोरण आहे.' हे तत्त्व अधिक महत्त्वाचे ठरणार आहे.

**कोणत्या व्यक्तींनी विशेष काळजी घ्यावी? :** खालील करदात्यांनी आपल्या आर्थिक नोंदी तातडीने तपासाव्यात- परदेशात नोकरी केलेले भारतीय, अनिवासी भारतीय वरून निवासी बनलेले नागरिक, दुहेरी निवासस्थान असलेले करदाता, परदेशातील बँक खातेधारक, विदेशी शेअर्समध्ये गुंतवणूक करणारे, अमेरिकन ईएसओपी प्राप्त कर्मचारी, परदेशात घर किंवा फ्लॅट असलेले नागरिक, विदेशी लाभांश किंवा व्याज मिळविणारे, ऑनलाईन आंतरराष्ट्रीय गुंतवणूक प्लॅटफॉर्म वापरणारे गुंतवणूकदार. सरकारकडून एकवेळ माहिती जाहीर करण्याची संधी. सरकारने एका विशेष एकवेळच्या प्रकटीकरणाची योजनाची रूपरेषा जाहीर केली आहे. यात दोन प्रकारच्या प्रकरणांचा विचार करण्यात आला.

१. न जाहीर केलेले विदेशी उत्पन्न किंवा मालमत्ता- जर एकूण न जाहीर केलेली रक्कम ₹ १ कोटींपेक्षा कमी असेल तर. ३० टक्के कर; त्या कराच्या १०० टक्के इतका दंड भरून माहिती जाहीर करण्याची संधी मिळू शकते.

२. वैध उत्पन्नातून खरेदी केलेली, पण जाहीर न केलेली विदेशी मालमत्ता- जर विदेशी मालमत्तेचे मूल्य ₹ ५ कोटींपेक्षा कमी असेल तर. ₹ १ लाख निश्चित शुल्क भरून माहिती जाहीर करता येऊ शकते.

या योजनेतून खालील प्रकरणे या सवलतीपासून वगळली जाऊ शकतात- गुन्हेगारी उत्पन्नातून मिळालेली मालमत्ता, काळा पैसा कायद्यांतर्गत आधीच तपास पूर्ण झालेली प्रकरणे, कायद्याने अपात्र घोषित केलेली प्रकरणे. हा बदल लक्षात घेता खालील कृती तातडीने करणे आवश्यक आहे- आपल्या एआयएसची नियमित तपासणी करा. परदेशातील सर्व बँक खाती आणि गुंतवणुकीची यादी तयार ठेवा. मागील काही वर्षांचे आयटीआर आणि अनुसूची एफए पुन्हा तपासा. विदेशी उत्पन्न भारतात करपात्र आहे का, याबाबत तज्ज्ञांचा सल्ला घ्या. दुहेरी कर टाळण्याचा करार (डी.टी.ए.ए.) चा लाभ मिळत असल्यास योग्य अंमलबजावणी करा. एआयएस आणि आयटीआरमधील माहितीमध्ये तफावत दुरुस्ती करा.

कधी कधी वित्तीय संस्थेकडून चुकीची माहिती पाठविली जाऊ शकते. उदा. चुकीचा पॅन जोडला जाणे, व्यवहाराची दुप्पट नोंद, चुकीची रक्कम, चुकीची व्यक्ती. अशा परिस्थितीत घाबरण्याचे कारण नाही. एआयएसमध्ये उपलब्ध असलेल्या प्रतिक्रिया सुविधेद्वारे संबंधित माहितीबाबत हरकत नोंदविता येते आणि आवश्यक पुरावे सादर करून दुरुस्ती मागता येते.

**निष्कर्ष :** भारतीय करप्रणाली जागतिक पारदर्शकतेच्या नव्या टप्प्यात प्रवेश करीत आहे. परदेशातील आर्थिक व्यवहार, बँक खाती, गुंतवणूक व मालमत्तेची माहिती आयकर विभागापर्यंत पोहोचत असल्याने ती योग्य प्रकारे आयकर विवरणपत्रात जाहीर करणे ही प्रत्येक करदात्याची जबाबदारी आहे. तज्ज्ञ करसल्ल्याच्या आधारे आपण भविष्यातील कर-विवाद, दंडात्मक कारवाई व अनावश्यक चौकशी सहज टाळू शकतो. कर पालनातील पारदर्शकता हीच जागतिक अर्थव्यवस्थेतील सुरक्षितता आहे. ■

९०९६३३२३५३

(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत)

## वेध

**रेवती जोशी-अंधारे**

# जगण्याचा 'फायर' ट्रेंड!

सोशल मीडियाच्या काळात दररोज जगण्याचे नवनवे ट्रेंड व्हायरल होतात आणि चर्चा सुरू होते. उद्याचा दिवस कोणी पाहिला? म्हणून आजचा दिवस तुमच्या हातात आहे तो भरभरून जगून घ्या, हा विचार समाजात विशेषतः कोरोनानंतर जास्त स्थिरावला. 'सातच्या आत घरात'चा ट्रेंड कालबाह्य ठरून, 'वर्क हार्ड, पार्टी हार्डर' स्वीकारून वेगळाच ट्रेंड आपण रुजवला. त्यात खाण्यापिण्यापासून गॅझेट्सपर्यंत अनेक गोष्टींचे ट्रेंड येत-जात राहिले आणि एन्जॉयमेंटच्या साच्यात आपण त्यांना घडवत राहिलो. 'श्यामच्या आई'ची काटकसर तर 'जेन झी'ने पुस्तकातही कदाचितच वाचली असेल. मुळात आपण भविष्याची तरतूद करून ठेवणाऱ्या कष्टाळू मुंग्यांना आदर्श मानणारे! पोटाला चिमटा काढून उद्याची सोय करून ठेवायची, उत्पन्नातून लहानशी का होईना पण बचत करण्याची आपली संस्कृती! पण, पाश्चिमात्यांनी सांगितल्याशिवाय कुठलीच गोष्ट आपल्या गळ्याखाली उतरत नाही. या न्यायाने सध्याच्या 'फायर ट्रेंड'चा वेध घेऊ या!

'फायनान्शियली इंडिपेन्डन्ट, रिटायर अर्ली' एफआयआरई म्हणजे फायर! प्रचंड कष्ट, वेळप्रसंगी दोन-तीन ठिकाणी कामं करून पैसा कमवायचा. मात्र, 'पार्टी हार्डर' न करता उत्पन्नाचा जास्तीत जास्त भाग निवृत्तीनंतरची तरतूद म्हणून गुंतवायचा. यासाठी, कल्पनेपलीकडची काटकसर करायची. आपल्या निवृत्तीची सोय झाली, असं वाटण्याइतके पैसे गुंतवले की निवृत्ती घ्यायची. समाधानकारक जीवनमान असलेल्या लहान देशांमध्ये स्थलांतरित व्हायचं, शेती करायची, गाई-म्हशी पाळायच्या आणि शांत जीवन आनंदाने जगायचं. मात्र, ही निवृत्ती साधारण चाळिशीतच घेण्याची तयारी ठेवायची. हा आहे सध्याचा 'फायर ट्रेंड'! मागच्या शतकात जन्मलेल्या आणि आज ज्यांना 'मिलेनियल' म्हटलं जातं त्या पिढीला कदाचित यात काहीच नवीन वाटणार नाही. कारण खूप कष्ट आणि काटकसर करून जीवन जगायचं, उधळपट्टी हा गुन्हा आहे, खूपच आवश्यक असेल तरच खर्च करायचे हे तर त्यांच्या जीवनाचे मूलभूत नियम होते आणि आहेत.

युरोपियन देशांमध्ये गेल्या दशकभरात सुरू झालेल्या फायर ट्रेंडचे लोण आपल्यापर्यंत येऊन पोहोचले आहे. हॉटेलिंग करायचे नाही, घरी स्वयंपाक करून कामावर जाताना सोबत डबा न्यायचा, विविध डिस्काऊंट कुपन्सचा कल्पकतेने वापर करायचा आणि हे सगळे उपाय करून उरणारी रक्कम गुंतवायची. गुंतवणुकीच्या पैशांवर उरलेले आयुष्य निवांत घालवायचे. असा हिशेब मांडताना आजारपण, अपघात आणि महागाईची संकल्पना लक्षात ठेवून नियोजन करण्याचा संदेश फायर चळवळीतील जाणते देतात.

ही एक जागतिक चळवळ असून ठिकठिकाणी या चळवळीच्या समर्थकांचे गट आहेत. नव्याने फायर अंमलात आणणाऱ्यांना, आधीपासून कार्यरत मंडळी उपयोगी टिप्स देतात. त्यात बचतीचे नवनवे पर्याय, चांगला परतावा देणारी गुंतवणूक, शेती-घर खरेदीतील बारकावे यांचा समावेश होतो. काही वित्तीय कंपन्या तर दरमहा मार्गदर्शिकाही प्रकाशित करतात. दुसरीकडे, उशिरा लग्न आणि अपत्यांचे संगोपन, महागाई, घरांच्या वाढत्या किमती आणि कर्जाच्या बोझ्यामुळे भविष्यासाठीच्या गुंतवणुकीचे प्रमाण कमी झाले आहे. निवृत्तीचे वयही पुरुषांमध्ये ६४.८ आणि त्यापेक्षा जास्त तर महिलांमध्ये ६३.३ पेक्षा जास्त नोंदविण्यात आलं आहे. वाढीव गुंतवणूक करून, लवकर निवृत्ती घेण्याचा विचारही करणे शक्य नाही. उत्पन्न मर्यादित असल्याने गुंतवणुकीवर बंधने आहेत. वित्तीय कंपन्यांच्या मते, बहुतांश ग्राहकांचं लक्ष काम आणि वैयक्तिक आयुष्यात अधिक चांगला समतोल साधण्यावर असतं. त्यामुळे निवृत्ती घेण्याची घाई करण्याऐवजी अर्थपूर्ण व्यावसायिक कारकीर्द आणि आपल्या आर्थिक क्षमतेनुसार जीवनशैलीचा समतोल साधण्यावर ते भर देतात. तुम्ही लवकर निवृत्त झालात पण, तुमचं सामाजिक वर्तुळ, चांगलं आरोग्य किंवा अर्थपूर्ण ध्येय नसेल, तर केवळ लवकर निवृत्तीचं ध्येय खरंच योग्य ठरतं का? निवृत्तीचं उद्दिष्ट गाठण्याचा प्रयत्न करतानाच आयुष्याचाही आनंद कसा घेता घेईल, असा सुवर्णमध्य युवा शोधत आहेत. चळवळीचे समर्थक आजही पराकोटीच्या काटकसरीलाच लवकर निवृत्तीचा मुख्य मार्ग मानतात.

चळवळीतील काही तत्त्वं खरोखर उपयुक्त आहेत आणि त्यांचा अवलंब केल्यास अगदी चाळिशीत नाही तरी पन्नाशीत निवृत्ती घेणं शक्य होऊ शकतं. लहान वयापासून बचत सुरू करणं आणि प्रत्येक वेतनवाढीनंतर निवृत्तीसाठीची बचत वाढवणं, असा लवचीक मार्ग अवलंबिता येईल. समतोल दृष्टिकोन स्वीकारल्यास मनावर अनावश्यक ताण न घेता, तुम्हाला हवी तशी आणि हवी त्या वेळी निवृत्ती घेणं शक्य होतं. त्यासाठी कोणत्याही ट्रेंडची नाही तर अधिक संतुलित आणि वास्तववादी दृष्टिकोनाची गरज आहे. ■

९२२३७००२७७

## प्रासंगिक

**वैजयंती वडनेरकर**

# असिधाराव्रत स्वीकारणाऱ्या युगप्रवर्तक

**राष्ट्र सेविका समितीच्या आद्य प्रमुख संचालिका वंदनीय मावशी उपाख्य लक्ष्मीबाई केळकर यांचा आषाढ शुद्ध दशमी (२४ जुलै २०२६) हा जन्मदिवस. समितीमध्ये तो दिवस 'संकल्प दिन' म्हणून साजरा केला जातो. तसेच राष्ट्र सेविका समितीच्या वाटचालीला यावर्षी ९० वर्षे झाली आहेत. त्यानिमित्त...**

युगप्रवर्तक म्हणजे, समाजातील अराजक वृत्तीतून निर्माण झालेल्या अस्थिर अशांत परिस्थितीवर मात करण्यासाठी समाजाच्या, मानवी मनाच्या शक्तीमध्ये सकारात्मक, विचारात्मक, संस्कारात्मक राष्ट्रीय हिताचे ध्येय समोर ठेवून, परिवर्तन घडवून आणून एक समर्थ, समक्ष वैचारिकदृष्ट्या परिपूर्ण समाज घडविण्यासाठी प्रतिकूल परिस्थितीतही संकल्प सिद्ध होऊन धर्माधिष्ठित कार्यासाठी आजीवन असिधाराव्रत स्वीकारून युग परिवर्तनाचे कार्य करणारे व्यक्तिमत्त्व. वंदनीय मावशींचा जन्मदिवस समितीमध्ये 'संकल्प दिन' म्हणून साजरा केला जातो.

पारतंत्र्याच्या आधीपासूनच अनेक आक्रमणांनी भारतीय अर्थ, राज्य व जीवन व्यवस्थेवर अनेक आघात केले. भारत सतत संघर्षरतच होता. स्त्रीशक्तीवर अन्याय-अत्याचार होत होते. अशा परिस्थितीत देश-धर्म-संस्कृतीच्या विचार, राष्ट्रभक्तीच्या संस्काराच्या मुशीतच ज्या परिवाराची जडणघडण झाली होती अशा दाते परिवारात जन्माला आलेल्या वंदनीय मावशी उपाख्य लक्ष्मीबाई केळकर यांच्या जीवनावर वेगळे संस्कार असणे शक्यच नव्हते. वंदनीय मावशींनी स्वातंत्र्यपूर्व काळातील आजूबाजूच्या समाजाचे बारकाईने अभ्यासपूर्ण निरीक्षण केल्यावर त्यांना स्त्रियांनी संघटित होऊन समाज घडणीच्या व राष्ट्र उभारणीच्या कार्यात संघटित शक्तीच्या रूपात मदत करणे काळाची गरज वाटू लागली. या साक्षात्कारातूनच त्यांनी राष्ट्रसेविका समितीची स्थापना २५ ऑक्टोबर १९३६ साली केली. तत्पूर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक प.पू. डॉ. हेडगेवार यांचे मार्गदर्शनातून हे विश्वव्यापी पाऊल उचलले. राष्ट्रसेविका समिती विश्वातील सर्वात मोठे महिलांचे स्वयंसेवी संघटन आहे. राष्ट्र सेविका समितीच्या ९० वर्षांच्या वाटचालीत हिंदुत्वाचा विचार, संस्कार व समाज आणि राष्ट्राप्रति असलेल्या समर्पित भावनेच्या कार्यपद्धतीतून समितीचे हे विश्वव्यापी संघटन झाले आहे. त्या माध्यमातून महिलांमध्ये शुद्ध शील-चारित्र्य तसेच शारीरिक-मानसिक-बौद्धिक क्षमता वाढवून कार्यपद्धतीतून सामाजिक समरसता समाजामध्ये निर्माण करते; शिवाय राष्ट्र जागृती संस्कार शिक्षा सेवा सामाजिक व राष्ट्रीय स्वास्थ्याबरोबरच येणाऱ्या आव्हानांना सक्षमपणे तोंड देण्यासाठी महिलांना स्वसंरक्षणक्षम बनविण्याचे अभूतपूर्व कार्य समितीच्या संस्कारातून होत असते. समितीचे कार्य पाहून स्वातंत्र्यवीर सावरकरांनी म्हटले होते की, अन्य महिला संघटनांचे कार्य किंवा राजकीय कार्य हे धो-धो पडणाऱ्या पावसासारखे आहे तर समितीचे कार्य रिमझिम पडणाऱ्या पावसासारखे आहे; जे राष्ट्रीय जीवनात सुसंस्काराचे व सकारात्मक विचारांचे बीजारोपण करते आहे.



समितीचे कार्य तेजस्वी राष्ट्राचे पुनर्निर्माण करण्याचे आहे. वंदनीय मावशी म्हणत, 'स्त्री ही संसार रथाची रथी नसून सारथी आहे आणि तिला आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवून श्रीकृष्णासारखे सारथ्य करून कुटुंब परिवार समाज आणि राष्ट्र घडवायचे आहे.' समिती कार्याची विशिष्ट कार्यपद्धती आहे. दैनंदिन शाखेच्या नित्य उपासनेतून अतिशय सरळ सोपी आणि कार्य कुशल कार्यपद्धती आहे. मंत्र छोटा तंत्र सोपे अशा पद्धतीने सेविका ते कार्यकर्ता अशा संस्काराच्या जडणघडणीसाठी दैनंदिन शाखा, एकत्रीकरण, अभ्यास वर्ग, नैपुण्य वर्ग, संमेलने, शिबिरे बैठकी, चर्चा, प्रशिक्षण वर्ग, बौद्धिक वर्ग आदी कार्यपद्धतीतून प्रशिक्षित केले जाते. हे कार्य व्यक्तिनिष्ठ नसून तत्त्व-ध्येयनिष्ठ आहे. राष्ट्र देवो भव या संस्कारातून समिती कार्य करते. त्यासाठी परिचय, सक्रियता, दायित्व, कार्यकर्ता, सेविका अशा दृष्टी विचार विस्तार आणि विकासातून सेविका घडते; त्यासाठी संपर्क संग्रह संस्कार नियोजनाचे कार्य केले जाते. संपर्क हे समिती कार्यात रक्तवाहिन्याचे काम करते. समिती संपूर्ण विश्वाला आपला परिवार मानते. बौद्धिक विभाग, शारीरिक विभाग, व्यवस्था विभाग, सेवा विभाग, धार्मिक विभाग, तरुणी विभाग, घोष विभाग तसेच वर्षप्रतिपदा, गुरुपौर्णिमा, रक्षाबंधन, विजयादशमी, मकर संक्रांत; सोबतच वंदनीय मावशीचा जन्मदिन संकल्प दिन व स्मृती दिन सेवा दिन म्हणून साजरा करून त्याद्वारे समिती कार्याच्या विचारांचा परिचय समाजाला करून दिला जातो. राष्ट्रहिताचे कार्य करणारी समिती देशाच्या प्रगतीसोबतच येणाऱ्या आव्हानांमध्येसुद्धा संपूर्ण शक्तिनिशी देशाच्या पाठीशी समर्थपणे उभी राहत असते. विविध चळवळींसोबतच कोरोना काळातील सेवाकार्य अतुलनीय आहे.

प्रमुख संचालिका म्हणून वं. मावशींनंतर वं. ताई आपटे, वं. उषाताई चाटी, वं. प्रमिलताई व वर्तमान प्रमुख संचालिका वं. शांताक्का अशा पंच दीपांच्या प्रखर तेजस्वी निष्ठावान व श्रद्धावान मातृहृदयी नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली समिती कार्याची वाटचाल सुरू आहे. समितीच्या माध्यमातून आज संपूर्ण भारतामध्ये एकूण २३१० सेवाकार्य सुरू असून त्यात शिक्षा ४३३, स्वास्थ्य २१९, स्वावलंबन १७६, धार्मिक १११० आणि अन्य ३७२, याशिवाय २३ प्रतिष्ठाने कार्यरत आहेत. २३ छात्रावासात आदिवासी दुर्बल आत्महत्याग्रस्त शेतकरी, पूर्वांचलातील म्हणजे देशातील संवेदनशील भागातील मुलींच्या शिक्षणासहित सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने कार्य सुरू आहे. विविध सेवाकार्यांच्या माध्यमातून समिती तळागाळापर्यंत पोचली आहे. आज समिती क्षेत्र १२, प्रांत ३८ व १०४२ जिल्ह्यात कार्यरत असून संपूर्ण भारतात शाखा संख्या ५००० आहे. कुटुंबाचा, परिवाराचा आधारस्तंभ असलेली मातृशक्ती हीच समितीची प्रेरणादायी शक्ती आहे. समितीच्या ९० वर्षानिमित्त होणाऱ्या वाटचालीच्या कार्यक्रमात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले असून अखिल भारतीय स्तरावर जवळपास २००० सेविकांचे सामूहिक घोषवादन २७ डिसेंबर २०२६ रोजी गुजरात प्रांतात कर्णावती येथे संपन्न होणार आहे. हे वर्ष म्हणजे सेविकांची साधना, समर्पण व राष्ट्र कार्याच्या गौरवपूर्ण प्रवास कार्याची स्मरणगाथा आहे. त्यानिमित्ताने संपूर्ण भारतभर प्रांत संमेलनाच्या आयोजनाचे नियोजन करण्यात आले आहे. हिंदू धर्म संस्कृती मां भारती, हिंदू जीवन मूल्यांचे संरक्षण व संवर्धन करीत विश्व कल्याणाची प्रार्थना करीत आवश्यक सप्तशतीने युक्त अशा मातृशक्तीचे संघटन असलेल्या राष्ट्रसेविका समितीच्या कार्यासाठी विश्व जननीला एवढीच प्रार्थना...

**निःश्रेयस्य प्राप्त्यर्थ, अभ्युथनप्रदं शुभम् ।**
**देहि सामर्थ्यम् इशे नो, विश्वमांगल्यकारकय् ।।** ■

९५७९६०९९७५

### पर्यटकांनी स्वयंशिस्त पाळावी

पावसाळा हंगाम म्हटले की सुटीचा दिवस गाठून पर्यटक सहकुटुंब आणि मित्र परिवाराबरोबर नजीकच्या निसर्गरम्य ठिकाणी पर्यटनास जातात. डोंगरातील धबधबे, घाट माथा, तलाव तसेच समुद्र किनारी परिसरात पर्यटक गर्दी करतात. हुल्लडबाजीत निसर्गाचा आनंद लुटताना जनाचे भान न ठेवता बीभस्त प्रकारे सामाजिक वातावरण दूषित करीत असतात. इगतपुरी येथील घडलेला प्रकार ताजाच आहे. पर्यटकांनी अति उत्साह टाळावा. स्वयंशिस्त पाळावी. वन विभाग, पर्यटन विभाग आणि पोलिसांनी समन्वय साधून जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समितीने उपाययोजना कराव्यात. पर्यटन ठिकाणी ऑनलाईन नोंदणी पद्धत सुरू करून नोंदणी केलेल्या पर्यटकांना प्रवेश देण्यात यावा. दुर्ग व पर्यावरण अभ्यासकाकडून जनजागृती करण्यात यावी. हवामान अंदाजाबाबत वेळोवेळी सूचित करण्यात यावे. धबधबा असणाऱ्या ठिकाणी अतिउत्साही पर्यटकांना प्रवेशास बंदी घालवी. सुटीच्या दिवशी पोलिस मनुष्यबळ वाढवून बंदोबस्त चोख ठेवण्यात यावा. धबधबा परिसरात गर्दी वाढू लागली वर मार्गावरील पर्यटकांना सूचित करून गर्दी आटोक्यात आणण्याचे प्रयत्न करावेत.

**नितीन कुंभार**/पिंपरी-पुणे

■■

### राजीनाम्याची दुर्दैवी मागणी

'नीट' परीक्षेतील पेपरफुटी प्रकरणातील आंदोलनात काही विद्यार्थ्यांच्या खांद्यावर नरेटिव्ह विचारांची बंदूक ठेवून जे काही गलिच्छ राजकारण केले जात आहे कीव करावीशी वाटते. अशा याआधी झालेल्या पेपरफफुटीच्या घटनांतून किती शिक्षणमंत्र्यांनी राजीनामे दिले होते, याचे परीक्षण करण्याची विरोधकांची खरी वेळ आहे. २००४ ते २०१४ या काँग्रेस सरकारच्या काळात पेपरफुटीच्या जवळजवळ ७०-७२ घटना घडल्या होत्या. जेव्हा जे शिक्षणमंत्री होते यापैकी एकाही मंत्र्यांनी राजीनामा दिला नव्हता. मग आजच विरोधक अपेक्षा का करून राहिले. त्यांना केवळ मोदी, आरएसएस आणि भाजपाद्वेष या नशेतून याचा विसर पडलेला दिसतो आहे. एवढेच काय, २००४ ते २०१४ या काळात शरदचंद्र पवार कृषिमंत्री असताना साधारण १,७०,००० च्या वर शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या. तेव्हा साहेबांनी राजीनामा दिला होता का? आज ते जंतर मंतरवर भेटी देत आहेत. उठसूट राजीनामा मागायचा नसतो आणि घ्यायचाही नसतो ही तर १२५ वर्षे जुन्या काँग्रेस सरकारची शिकवणूक विसरून कशी चालेल? यासाठीच केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधानांच्या राजीनाम्याची मागणी दुर्दैवी आहे असे वाटते.

**अमोल करकरे**/खेड-रत्नागिरी, ९९६७९२७६१७

■■

## वाचक पत्रे

### अशैक्षणिक जबाबदाऱ्यांचा डोंगर

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ नुकतेच सुरू झाले असून विद्यार्थ्यांना ज्ञानदान करण्याऐवजी शिक्षकांच्या मानगुटीवर अशैक्षणिक जबाबदाऱ्या टाकल्यामुळे शिक्षकांच्या शारीरिक व मानसिक स्थितीवर परिणाम होऊ लागला आहे. मुख्य निवडणूक आयोगाने ३ जुलै २०२६ रोजी शिक्षकांना इतर कोणत्याही अशैक्षणिक कामात गुंतवू नये, असे स्पष्ट निर्देश दिले असून शिक्षण विभागाने सर्वेक्षणाची जबाबदारी शिक्षकांवरच सोपवली आहे. राज्यात सध्या शिक्षकांना मतदार यादी सुधारणा कार्यक्रम तसेच बुथ लेवल ऑफिसर ही कामे सोपविलेली असतानाच आता प्राथमिक शिक्षण संचालनालयाने १५ ते ३० जुलैदरम्यान शाळाबाह्य अनियमित आणि स्थलांतरित बालकांचे सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले आहेत. या सर्व कामामुळे अशैक्षणिक कामे करायची की विद्यार्थ्यांना शिकवायचे अशा मानसिक तणावातून शिक्षक जात आहेत. शिक्षकांच्या शारीरिक आणि मानसिक परिस्थितीचा विचार करता शासनाने शिक्षकांना अशैक्षणिक कामांपासून दूर ठेवले पाहिजे. संस्थाचालक, ग्रामस्थ हे शिक्षकांकडून चांगल्या गुणवत्तेची व निकालाची नेहमीच अपेक्षा करतात. अशावेळी शिक्षकांना जर विद्यार्थ्यांपासून दूर ठेवून अशीच अशैक्षणिक कामांची जबाबदारी दिली जात असेल तर आपण शिक्षणात अग्रेसर असलेल्या केरळ राज्याकडून काहीच बोध घेतला नाही, हे सिद्ध होते. शिक्षकांनी ही कामे केले नाही तर अधिकारी वर्ग कारवाईची भाषा करत असतात. हे थांबणे आवश्यक आहे अन्यथा शिक्षण क्षेत्रातून उद्रेक झाल्याशिवाय राहणार नाही.

**शशिकांत जाधव**/पुणे

■■

### विचलित करणारे आंदोलन

देशात अराजकता पसरविणे हाच उद्देश समोर ठेवून वावरणारे विरोधक व त्यांचे तथाकथित तरुण नेतृत्व या मार्गाने देशाची सत्ता हस्तगत करू शकतील काय? निश्चितच नाही. मात्र, समाजकंटकांना मोकळे रान उपलब्ध करून देऊ शकतील. तरुण विद्यार्थ्यांना वापरून घेण्यात हे तरबेज आहेत. सरकार मात्र विद्यार्थ्यांचा रोष लक्षात घेऊन कारवाई करण्यास कमी पडले असे वाटते वा जी पाउले उचलली ती असंतोष कमी करण्यात पर्याप्त ठरली नाहीत असे दिसते. कारवाई पारदर्शक व समाज मनाला पटणारी असावी. नैतिक जबाबदारी कोणाची असेल तर ते दिसावयास नको काय? काही झाले तरी सरकारने सक्त राहून हुडदंग माजवणारे चिन्हित करून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करणे आवश्यक आहे. ■

**संजय वेलणकर**

हे पत्र **मालक, सोलापूर तरुण भारत मिडीया लिमिटेड** करिता, **मुद्रक, प्रकाशक** कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी प्लॉट नं. ए-३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को ऑप. सोसायटी, रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर, ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत प्लॉट नं. ए- ३२ छत्रपती संभाजीनगर, इंडस्ट्रीयल को ऑप. सोसायटी, रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद ४३१००५ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. **संपादक :** विजयकुमार माधवराव पिसे. / **कार्यकारी संपादक :** प्रशांत वसंतराव माने

E-mail - stbaurangabad@gmail.com, Mob : 8888847268

Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, published by MR.KULBHUSHANRAM RAMAKRISHNA TARE Printed at CHATRAPATI SAMBHAJINAGAR INDUSTRIAL CO OP SOCIETY, CHATRAPATI SAMBHAJINAGAR 431005.(Maharashtra) **Editor :** Mr.VIJAYKUMAR MADHAVRAO PISE. / **Exicutive Editor** : Mr. PRASHANT VASANTRAO MANE. E-mail : stbaurangabad@gmail.com Mobile : 8888847268.

# नागरिकाभिमुख प्रशासन व नाविन्यपूर्ण उपक्रमांना गती द्या– विभागीय आयुक्त जी. श्रीकांत

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ जुलै**




'विकसित भारत' या संकल्पनेच्या धर्तीवर 'विकसित हिंगोली' घडविण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने, गुणवत्तापूर्ण आणि कालबद्ध पद्धतीने कामे पूर्ण करावीत. औंढा नागनाथ तीर्थक्षेत्राला 'अ' दर्जा प्राप्त करून देण्यासाठी आवश्यक विकासकामांना गती देणे, हिंगोली शहरासह प्रमुख शहरांच्या पिण्याच्या पाण्याच्या योजना मार्गी लावणे, हळद प्रक्रिया उद्योगाला चालना देणे, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांची प्रभावी अंमलबजावणी करणे तसेच नागरिकाभिमुख, पारदर्शक आणि उत्तरदायी प्रशासन उभारण्यावर विशेष भर देण्याचे निर्देश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी हिंगोली जिल्हा प्रशासनाला दिले.

छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन सभागृहात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते बैठकीस जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, पोलीस अधीक्षक श्रेणिक लोढा, अपर विभागीय आयुक्त दादासाहेब वानखडे, सहआयुक्त (महसूल) राजेश काटकर, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) अनिल माचेवाड, मंजुषा मुथा यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

औंढा नागनाथ येथील नागेश्वर मंदिराला 'अ' दर्जा प्राप्त करून देण्यासाठी बाह्य विकास आराखड्यातील सर्व कामे गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करावीत. तिरुपती बालाजी मंदिराच्या धर्तीवर यात्रेकरूंना आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पार्किंग, स्वच्छता, पादचारी सुविधा, सुशोभीकरण, माहिती केंद्र, वाहतूक नियोजन व मूलभूत सुविधा विकसित करण्याचे निर्देश विभागीय आयुक्तांनी दिले. मंदिर परिसरात प्लास्टिकबंदीची प्रभावी अंमलबजावणी, बेलपत्र, नारळ व निर्माल्याची शास्त्रोक्त विल्हेवाट, घनकचरा व्यवस्थापनासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारणे आणि तलावातील पाण्याची गुणवत्ता अबाधित ठेवण्यासाठी नियमित देखरेख ठेवण्यावर त्यांनी भर दिला.

हिंगोली शहरासह प्रमुख शहरांना दररोज शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध होण्यासाठी सर्व प्रकल्पांना गती द्यावी. सिद्धेश्वर प्रकल्पातून गुरुत्वाकर्षण पद्धतीने पाणी आणण्याचे काम तातडीने पूर्ण करावे. संबंधित विभागांनी पुढील दोन आठवड्यांत कामांच्या प्रगतीचा व गुणवत्तेचा अहवाल सादर करावा, असे निर्देश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी मुख्याधिकाऱ्यांना दिले.

औंढा नागनाथ, वसमत, कळमनुरी आणि सेनगाव येथे सांडपाणी प्रक्रिया केंद्रे व घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारण्यासाठी आवश्यक भूसंपादन तातडीने पूर्ण करावे. छत्रपती संभाजीनगर, नांदेड व लातूर येथील प्रकल्पांचा अभ्यास करून त्याच धर्तीवर कामे पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. मुख्याधिकाऱ्यांनी दररोज सकाळी शहरांची प्रत्यक्ष पाहणी करून स्वच्छतेवर भर द्यावा. आवश्यकतेनुसार वापरकर्ता शुल्काची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित नगरपालिकांच्या मुख्याधिकाऱ्यांना यावेळी दिल्या. जिल्ह्याच्या विकासासाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून नावीन्यपूर्ण कल्पना मागवून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी. 'विकसित हिंगोली' हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रत्येक विभागाने परिणामकारक कामगिरी करावी, असे आवाहन त्यांनी केले.

जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर उत्पादित होणाऱ्या हळदीचे मूल्यवर्धन करून निर्यातक्षम उद्योग विकसित करण्यासाठी शेतकरी उत्पादक गट तयार करावेत. त्यांना प्रक्रिया, पॅकेजिंग, गुणवत्ता मानके आणि निर्यातीसंदर्भात प्रशिक्षण देऊन एपिडा व संबंधित संस्थांच्या माध्यमातून बाजारपेठ उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश त्यांनी दिले. जिल्ह्यात उत्पादित होणारी हळद निर्यात करण्यासाठी आता जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट येथे नेण्याची आवश्यकता नसून जालना येथील ड्रायपोर्टवर ही सुविधा उपलब्ध झाली असल्याचे विभागीय आयुक्तांनी यावेळी सांगितले.

हिंगोली जिल्ह्यात बांधण्यात येणाऱ्या केंद्रीय विद्यालयाचे काम वेळेत पूर्ण करावे. युवकांना, विशेषतः पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या उमेदवारांना सुरक्षित धावपट्टी व क्रीडांगणे उपलब्ध करून द्यावीत, जेणेकरून रस्त्यांवर सराव करताना होणारे अपघात टाळता येतील आणि जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवक-युवती शासकीय सेवेत दाखल होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सेवाकालात किंवा सेवानिवृत्तीनंतर कर्मचाऱ्यांना शासकीय लाभांसाठी अनावश्यक हेलपाटे मारावे लागू नयेत. किरकोळ कारणांमुळे कर्मचाऱ्यांना त्रास देऊ नये. त्यासाठी नियमित कर्मचारी समाधान शिबिरांचे आयोजन करण्याचे निर्देश विभागीय आयुक्तांनी दिले.

गावातील पोलीस पाटील संबंधित गावातच वास्तव्यास असणे आवश्यक असून, तसे नसल्यास नियमानुसार कारवाई करावी. जिल्ह्यातून जात असलेल्या राज्य व राष्ट्रीय महामार्गांवरील अतिक्रमणे तातडीने हटवावीत. तसेच महसूल आणि पोलीस प्रशासनाने रेतीचोरांना अजिबात पाठीशी घालू नये व दोषींवर कठोर कारवाई करावी, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेत शंभर टक्के नोंदणी करण्यावर भर देण्यात आला. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या केंद्रस्तरीय प्रतिनिधींचा यावेळी प्रातिनिधीक स्वरुपात सत्कार करण्यात आला. शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांना शासनाच्या योजनांचा लाभ तातडीने मिळवून देण्यासाठी प्रकरणे प्राधान्याने निकाली काढण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच रस्ते अपघात टाळण्यासाठी ब्लॅक स्पॉटची ओळख पटवून आवश्यक उपाययोजना करण्यास सांगण्यात आले. जिल्ह्यात अलीकडे भूकंपाचे सौम्य धक्के जाणवत असल्याने तज्ज्ञ समितीमार्फत अभ्यास करून नागरिकांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मुख्याधिकारी आणि विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

## आषाढी एकादशीनिमित्त नर्सी नामदेव येथे प्रशासनाची जय्यत तयारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ जुलै**



हिंगोली जिल्ह्यातील संत शिरोमणी नामदेव महाराज यांची पावन जन्मभूमी नरसी येथे आषाढी एकादशीच्या पावन पर्वावर लाखो भाविक दाखल होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. हीच बाब लक्षात घेऊन मंदिर प्रशासन व स्थानिक प्रशासनाच्या वतीने भाविकांच्या सुलभ दर्शनासाठी जय्यत तयारी करण्यात आली आहे. भाविकांची कोणतीही अडचण किंवा गैरसोय होऊ नये यासाठी विशेष दक्षता घेतली जात आहे. दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांसाठी सुटसुटीत आणि सुरक्षित दर्शन रांगांची सुयोग्य व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच, पावसाळ्याचे दिवस असल्याने ऐनवेळी भाविकांचे हाल होऊ नयेत म्हणून संपूर्ण परिसरात भव्य वाटरप्रूफ मंडप उभारण्यात आला आहे. याशिवाय स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छता गृह, सुरक्षा व्यवस्था आणि इतर मूलभूत सुविधा पुरवण्यावर प्रशासनाने विशेष भर दिला आहे. या सर्व तयारीच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने संपूर्ण मंदिर परिसराची पाहणी करण्यात आली. या पाहणीदरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागाचे रोहित नादरे यांच्यासह विभागातील संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर सर्व शासकीय व मंदिर यंत्रणा पूर्णपणे सज्ज असून, भाविकांना अत्यंत सुरक्षित, शांततेत आणि सुलभतेने दर्शन घेता यावे यासाठी सर्व आवश्यक त्या उपाययोजना पूर्ण झाल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

## हिंगोलीहून पंढरपूरला मार्गस्थ झालेल्या वारकऱ्यांना फराळाचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ जुलै**

आषाढी एकादशीच्या पावन पर्वावर पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांच्या सेवेसाठी हिंगोली विधानसभेचे आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांच्यावतीने हिंगोली रेल्वे स्थानकावर विशेष रेल्वेने पंढरपूरकडे मार्गस्थ झालेल्या सर्व वारकऱ्यांना फराळ आणि पिण्याच्या पाण्याच्या बॉटल्सचे वाटप करण्यात आले. पंढरीच्या विठूरायाच्या दर्शनासाठी निघालेल्या शेकडो वारकऱ्यांचा प्रवास सुकर व्हावा आणि त्यांना प्रवासात कोणतीही अडचण भासू नये, या उद्देशाने आमदार मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षीप्रमाणे यावर्षीही हा उपक्रम रेल्वे स्थानकावर राबविण्यात आला. यावेळी स्थानकावर आलेल्या सर्व वारकऱ्याचे आदरातिथ्य करून त्यांना फराळ व पाण्याच्या बॉटल्सचे वाटप करण्यात आले. तसेच वारकऱ्यांचे पुष्पहार घालून आ.मुटकूळे यांनी स्वागत केले.

याप्रसंगी सौ.जिजाबाई मुटकूळे, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, भाजयुमो जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकूळे, के.के. शिंदे, नारायण खेडकर, सौ. राजामती मुटकूळे, सरचिटणीस उमेश नागरे, जिल्हा प्रवक्ता विलास गोरे, माजी युवामोर्चा अध्यक्ष पप्पु चव्हाण, भानुदास वाबळे, शहराध्यक्ष रजनीश पुरोहित, मंडळ अध्यक्ष माणिक लोडे, गोवर्धन अण्णा विरकुंवर, नगरसेवक हमीद प्यारेवाले, कैलास शहाणे, उमेश गुठ्ठे, संतोष टेकाळे, पृथ्वी मुटकूळे, कार्याध्यक्ष पवन उपाध्ये, कैलास श्रीनाथ, समीर भीसे, महेश थोरात, युवामोर्चा तालुकाध्यक्ष भाऊराव ठाकरे, हनुमान करहाळे, बाबा घुगे, मंदाकिनी चव्हाण, सदाशिव सूर्यतळ, सुनील राठोर, क्रिष्णा रुहाटीया, वंदना गायकवाड, पद्माकर नायक, गुड्डू देवकते, श्रीरंग राठोड, नितीन राठौर, अमित रुहाटिया, आशिष शर्मा, सुरज व्यास, जावेद दुल्हा यांच्यासह भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### सांदीपनीमध्ये लोकमान्य टिळक जयंती साजरी



हिंगोली- सांदीपनी पब्लिक स्कूल, सुनिल नगर, तरोडा (बु.), नांदेड येथील येथील शाळेत लोकमान्य टिळक जयंती उत्साहात संपन्न झाली. कार्यक्रमाच्या सुरूवातीला शाळेच्या मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी यांच्या हस्ते लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर शाळेतील सहशिक्षक जोगदंड खंडू यांनी लोकमान्य टिळक यांचे जीवन व कार्य यासंदर्भात विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे संचालक सुनिल राठोड, सहसंचालक मुकूल राठोड, सौ. माहेश्वरी मुकूल राठोड, उपमुख्याध्यापिका सौ. हरप्रित कौर, शाळेचे प्रशासक मारूती मेखाले यांची प्रमुख उपस्थित होती. यावेळी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वंचीतच्या जिल्हा बंदला संमिश्र प्रतिसाद



हिंगोली- दिल्ली येथील जंतर मंतरवरील आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीमाराचा तसेच अश्रूधूराच्या नळकांड्यांचा मारा यांच्या विरोधात वंचीत बहुजन आघाडीच्यावतीने दि २३ जुलै रोजी जिल्हा बंदची हाक देण्यात आली होती. यावेळी वंचीतच्यावतीने येथील संविधान चौकातून मोर्चा काढण्यात आला. शहरातील डॉ बाबासाहेब आंबडेकर चौक, महात्मा गांधी चौक, जवाहर रोड, पोस्ट ऑफीस रोड मार्गे छत्रपती शिवाजी महाराज पूर्णाकृती पूतळा येथे हा मोर्चा पोहोचला. यावेळी दिल्ली येथील जंतरमंतरवरील विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर सरकारने तत्काळ तोडगा काढावा तसेच संबंधितांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली. या मोर्चात जिल्हाध्यक्ष शिवाजी खरात, सुनील खिल्लारे, प्रकाश राऊत, विनोद नाईक, योगेश नरवाडे, श्रीमती सुनीता निरगुडे, भूषण पाईकरावख, सगनराव निरगुडे यांच्यासह वंचीत बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दुपार पर्यंत शहरातील व्यापारी प्रतिष्ठाने बंद ठेवण्यात आली होती. मोर्चाच्या पार्श्वभूमीवर तगडा पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता.

## मराठवाडा चेंबर्स अॅन्ड ट्रेड कॉमर्सची धर्माबाद येथे व्यापार परिषद

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ जुलै**

मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्सच्या २९ व्या वर्धापन दिनानिमित्त धर्माबाद जिल्हा नांदेड येथे दि. २६ जुलै रविवार रोजी सकाळी दहा वाजता भव्य मराठवाडा व्यापार परिषदेचे आयोजन केसरी मलजी करवा प्रेक्षागृह, राजाराम काकानी सहकार विद्या मंदिर येळवत रोड येथे करण्यात आले आहे.

या व्यापार परिषदेचे उद्घाटक महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष रविंद्र मानगावे तर अध्यक्षस्थानी मराठवाडा चेंबरचे अध्यक्ष आदेशपाल सिंग छाबडा हे असणार आहेत. परिषदेचे प्रमुख मार्गदर्शक गोदावरी अर्बन मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या अध्यक्षा सौ राजश्रीताई हेमंत पाटील तर सुनील किर्दक उपाध्यक्ष महाराष्ट्र चेंबर व राहुल हिंगमिरे प्रख्यात सुप्रीम कोर्ट विधिज्ञ यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. मराठवाडा नेहमीच आवर्षणग्रस्त असल्यामुळे या भागातील व्यापारी वर्गाच्या समस्या राज्यातील इतर भागातील व्यापारी वर्गापेक्षा वेगळ्या आहेत. त्या सोडवण्यासाठी महाराष्ट्र चेंबर व मराठवाडा चेंबर च्या माध्यमातून काय करता येईल या विषयावर या परिषदेत चर्चा होणार आहे. सरकार महानगरपालिकेच्या माध्यमातून पुढील काळात आस्थापना कर लावण्याच्या तयारीत आहे तसेच महावितरणने लावलेले ग्रिड सपोर्टिंग चार्ज, व्यवसाय कर मार्केट कमिटीचे विविध प्रश्न, जीएसटी मध्ये असलेल्या किचकट अटी तसेच व्यापारी बांधवांना पेन्शन मिळण्या संबंधी तसेच इतर विषयावरही सरकारचे लक्ष गंभीरतेने वेधण्याचा या परिषदेच्या माध्यमातून होणार आहे. या परिषदेस महाराष्ट्र चेंबरचे माजी अध्यक्ष मानसिंह पवार, उपाध्यक्ष सत्यनारायणा लाहोटी, तनसुख झांबड, प्रफुल मलानी व मराठवाडा चेंबरचे माजी अध्यक्ष कल्याणजी बरकसे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. ही परिषद यशस्वी होण्यासाठी नांदेड अडतीया असोसिएशनचे अध्यक्ष सुबोध काकानी व त्यांची टीम परिश्रम घेत आहे. या परिषदेत व्यापार व सामाजिक क्षेत्रात उत्कृष्ट व कौतुकास्पद कार्य करणाऱ्या व्यापाऱ्यांचा ही स्मृतिचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. या परिषदेत जिल्ह्यातील जास्तीत जास्त व्यापारी बांधवांनी उपस्थित राहून व्यापारी वर्गाची एकजूट सरकारला दाखवावी असे आवाहन मराठवाडा चेंबरचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, शहराध्यक्ष पंकज अग्रवाल यांनी केले आहे.

## जंतरमंतर वरील विद्यार्थ्यांच्या आंदोलनला जिल्हा वकील संघाचा पाठींबा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ जुलै**



दिल्ली येथील जंतरमंतरवर विद्यार्थ्यांसाठी सुरू असलेल्या आंदोलनास पाठींबा तसेच अमानुषपणे झालेल्या लाठीचार्जचा जिल्हा वकील संघाच्यावतीने निषेध करीत या आंदोलनास समर्थन दिल्याचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहे.

नीट पेपर लीक प्रकरणी दिल्ली येथील जंतरमंतरवर विद्याथी शांततते आंदोलन करीत आहेत. सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक व विद्यार्थी नेते अभिजीत दिपके, नेहा बोरा आदींच्या नेतृत्वात हे आंदोलन मागील महिनाभरापासून शांततेत सुरू असून दि २० जुलै रोजी आंदोलनातील विद्यार्थ्यांवर पोलिसांनी केलेल्या लाठीचार्जचा जिल्हा वकील संघाच्यावतीने निषेध करण्यात आला. या आंदोलनाच्या माध्यमातून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा, राष्ट्रीय परीक्षा संस्था बरखास्त करून राज्यस्तरीय वैद्यकीय परीक्षा घ्या, वैद्यकीय प्रवेश परीक्षा पारदर्शकपणे राबवा, विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीमारची चौकशी करून दोषींना निलंबीत करावे आदी मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत. यावेळी वकील संघाचे जिल्हाध्यक्ष अॅड. श्रीधर घुगे, सचिव अॅड. मिलींद कांबळे, अॅड आर एन अग्रवाल, अॅड पंजाब चव्हाण, अॅड ऋषीकेश वाबळे यांच्यासह वकीलांची उपस्थिती होती.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ जुलै**

महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून, हिंगोली शहर भारतीय जनता पक्ष, भाजपा युवामोर्चा आणि हिंगोली ग्रामीण मंडळाच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. आमदार तान्हाजीराव मुटकुळे व भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष शिवाजी मुटकूळे, भा यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या शिबिरात तब्बल १०७ रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले.

या शिबिराचे उद्घाटन आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांच्या हस्ते करण्यात आले. मुख्यमंत्री महोदयांच्या वाढदिवसासारखा आनंदाचा क्षण सामाजिक उपक्रमाने साजरा करून कार्यकर्त्यांनी समाजासमोर एक आदर्श वस्तुपाठ ठेवला आहे, अशा भावना यावेळी आ.मुटकूळे यांनी व्यक्त केल्या. याप्रसंगी भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, प्रकाशराव थोरात, के. के शिंदे, नारायण खेडकर, सरचिटणिस उमेश नागरे, जिल्हा प्रवक्ता विलास गोरे, शहराध्यक्ष रजनीश पुरोहीत, मंडळ अध्यक्ष माणिक लोडे, नगरसेवक अॅड.राजेश गोटे, कैलाश शहाणे, उमेश गुठ्ठे, कार्याध्यक्ष पवन उपाध्ये, कैलाश श्रीनाथ, संतोष साबळे, समिर भीसे, शेख अतीक, चांदु लांडगे, अशिष जैस्वाल, शांतीरत्न थोरात, युवामोर्चा तालुकाध्यक्ष भाऊराव ठाकरे, हनुमान करहाळे, बाबा घुगे, सदाशिव सुर्यतळ, समिर भिसे, सुनिल राठौर, क्रिष्णा रुहाटीया, पदमाकर नायक, श्रीरंग राठोड, नितीन राठौर, अमित रुहाटिया, अशिष शर्मा, सुरज व्यास, राजु जाधव, दत्तराव तनपुरे यांची प्रमुख उपस्थित होती. शिबिर यशस्वी करण्यासाठी भाजपा युवामोर्चा आणि हिंगोली शहर आणि ग्रामीण मंडळाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

जगातील कोणतेही ज्ञान मराठी माणसांपासून दूर राहू नये यासाठी विश्वकोश तयार करण्यात आला आहे. आतापर्यंत विश्वकोशाचे २३ खंड प्रकाशित झाले आहेत. वर्तमानात तंत्रज्ञानाची जोड मिळाल्यामुळे मराठी विश्वकोश व्यापक व अद्ययावत होत आहे. विश्वकोशातील नोंदीत अतिशय व्यापक व कमीतकमी शब्दात माहिती मांडली जाते. मराठी विश्वकोशाचा पहिला खंड १९७६ साली तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली प्रसिद्ध झाला होता. याशिवाय विश्वकोशातील भौतिकविज्ञान व तंत्रज्ञान या कोशाचेही काम सुरू आहे. ९वी ते १२वीचे विद्यार्थी डोळ्यासमोर ठेवून कुमार विश्वकोशाचा पहिला खंड पूर्ण झाला आहे.

www.tarunbharat.net
शनिवार, दि. २५ जुलै २०२६
तरुण भारत
छोटे उस्ताद



## गुलदस्ता

# बहारदार पारिजात

निशिकांत मायी / ९८८११५२४३९

रात्रीच्या वेळेस फुलणारे, बहरणारे अन्? सकाळच्या सुमारास अक्षरश: फुलांचा सडा पडल्यागत जमिनीवर विखुरणारे मोहक असे पारिजात अर्थात प्राजक्ताचे फूल! हिंदीत ते हरसिंगार नावानेही प्रचलित आहे. काही ठिकाणी या फुलाला शेफालिका असेही म्हणतात. अत्यंत मनमोहक असा सुगंध आसमंतात पसरवणारे, भारतात उगवणारे हे एक औषधी झाड आहे. नाजूक नारंगी देठ आणि पांढऱ्या पाकळ्यांचे नैसर्गिकरीत्या उगवणारे प्राजक्ताचे वृक्ष उपवनात तसेच घरच्या बागेतही हौसेने लावले जाते. पाच ते सात मीटर उंच असलेल्या फांद्या चौकोनी आणि पानं खरखरीत असतात. यांचे वैशिष्ट्य असे की या पानावर टोकाकडून देठाकडे बोट फिरविले असता त्यावर काटे असल्याचा आपल्याला भास होतो. हाडांच्या दुखण्यावर या पारिजातकाच्या पानांचा वापर केला जात असल्याचा उल्लेख आढळतो. विविध दुखण्यांवर हे प्रभावशाली आहे. या पारिजातकाच्या फुलझाडाबाबत एक आख्यायिका



प्रचलित आहे. पारिजात हे रत्न असून समुद्र मंथनातून त्याची निर्मिती झाली आहे. इंद्र देवाने ते स्वर्गलोकात जाऊन लावले.? नंतर, भगवान श्रीकृष्णाने पारिजातकाचे हे झाड स्वर्गातून पृथ्वीवर आणले. झाड कुठे लावावे यावरून सत्यभामा आणि रुक्मिणी यांच्यात वाद झाला. मग श्रीकृष्णाने क्लृप्ती लढवून ते सत्यभामेच्या अंगणी अशा ठिकाणी लावले की, फुले उमलल्यावर रुक्मिणीच्या अंगणात फुलांचा वर्षाव होईल. त्यामुळेच याला स्वर्गीय फुलाचा मान प्राप्त झाला आहे. म्हणूनच स्वर्ग लोकांत अप्सरा, उर्वशी आपले नर्तन झाल्यावर थकवा या झाडाला स्पर्श करून घालवीत. पारिजातकाच्या फुलांच्या पाकळीची मधली बाजू भगव्या रंगाची असते, हे येथे उल्लेखनीय! प्राजक्ताच्या फुलांना साधारण चार ते आठ पाकळ्या असतात, ज्या टोकाकडे किंचित दुभंगलेल्या असतात. फुलांच्या मधुर सुवासाने प्रत्येक जण हरखून जातो. याचा बहर जुलै ते डिसेंबरपर्यंत असतो. इतर वेळी तुरळक फुले झाडांवर बघायला मिळतात. विद्येची देवता श्री गणेशाचे हे आवडते फूल असून श्रीकृष्णालाही तितकेच आवडते. लक्ष्मी पूजनातही या फुलांना विशेष स्थान आहे. त्याची फुले आयुर्वेदातही महत्त्वपूर्ण ठरली आहेत. याच्या फुलांपासून खाण्याचा पिवळा-केशरी रंग तयार केला जातो तसेच, विविध प्रकारची अत्तरे आणि सौंदर्य प्रसाधने तयार केली जातात. पारिजातकाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे सूर्यास्तानंतर या फुलांचा बहर वाढत जाऊन रात्रीच्या सुमारास तो अधिक दाट होतो. अगदी पहाटे फुलांची गळती सुरू होऊन सूर्योदयाच्या पूर्वी जवळपास सगळी फुले गळून पडलेली दिसतात. देशभरात सर्वच ठिकाणी प्राजक्ताच्या फुलांचा देवपूजेत आवर्जून समावेश होतो. पारिजातकाची पाने कोमट करून बारीक करून ती पेस्ट सांधेदुखीवर लावल्याने खूप फायदा होतो.

## Math puzzle

**Guess the number.**

I am three digit number.

First digit is double of second digit.

Second digit is square root of third digit.

Third digit is addition of first and second digit.

Previous Word Puzzle Answer : * Teeth * Merit *East *Emaile * Heat * Tear

— मागील अंकातील शब्दचक्र पंचाक्षरीचे उत्तर —
1. जनानखाना 2. जबाबदारी 3. जलसमाधी 4. जलतरण 5. जकातनाका 6. जमिनदोस्त 7. जलतरंग 8. जनमेजय

## प्रसिद्ध म्हणीच्या शोधात गुप्तहेर !

आमचे एक साहित्यिक मित्र आपल्या पुढील लेखनसाहित्यात वापरण्यास दोन महत्त्वपूर्ण प्रसिद्ध म्हणी (वाक्प्रचार) सोबत घेऊन चालले होते पण त्यांना ठेच लागली आणि या दोन्ही म्हणींतील अक्षरे विखरून गेलीत. त्यांना योग्य क्रमात जोडणे फार कठीण काम होते, यासाठी त्यांनी एका गुप्तहेराला ही अक्षरे योग्य क्रमात जोडण्याचे कार्य सोपविले.

तुम्ही सुद्धा ही दोन प्रसिद्ध म्हणी शोधू शकता.




## देशोदेशीच्या लोककथा

प्रीती वडनेरकर/ ९८२३९९४७९२

भाग - ३४



# सिंदबादची दुसरी सफर

माझ्या मित्र मैत्रिणींनो, तुम्हाला सिंदबादची पहिली सफर आठवत असेलच. इराकमधला बगदादचा सिंदबाद सेलर म्हणजे नावाडी, त्याची समुद्रातली सफर, देवमाशाच्या पाठीवरचं जंगल, सगळंच अद्भुत! पहिल्या सफरीत, दयाळू राजानं सिंदबादला भरपूर सोन्याच्या नाण्यांच्या थैल्या दिल्या होत्या. सिंदबादनं बगदादला, भली मोठी आलिशान हवेली बांधली. आपल्या बायको मुलांसह तो राजेशाही थाटात तिथे राहू लागला.

पण थोड्याच दिवसात परत त्याला समुद्रातून, वेगवेगळ्या बंदरांतून फिरून व्यापार करण्याचा मोह झाला. त्याच्या अब्बूचे मित्र कबीर, बगदाद मधली श्रीमंत आसामी होती. सिंदबाद त्यांच्याकडे गेला.'चाचाजान, कसे आहात? व्यापार कसा चालला आहे? आपण बऱ्याच वर्षांनी भेटत आहोत. माझ्या अब्बूजानला जाऊनसुद्धा खूप वर्षे झाली,' तो म्हणाला.'हो रे... खरंच आपल्याला भेटून खूप वर्षे झाली. तू आता परत समुद्रातून, बंदरांवर व्यापारासाठी निघणार आहेस का? मी तुला व्यापारासाठी, माझा माल दिला असता, पण मी माझा सर्व माल वेगळ्याच कोणाला दिला आहे. तो बगदादचा नाही आहे. बरं, ते जाऊ दे! मी जरा घाईत आहे. लौकरच पुन्हा भेटू.'कबीर चाचा घाईघाईनं निघून गेले.

सिंदबादला त्यांच्या बोलण्याचं, घाईघाईनं जाण्याचं खूप आश्चर्य वाटलं. काहीतरी गूढ असल्याचा संशय आला. मात्र इतर व्यापाऱ्यांकडून, त्यांचा माल घेऊन सिंदबाद परत समुद्रफिरतीवर निघाला. यावेळेचं जहाज मोठं होतं. ऐसपैस होतं. सिंदबाद मुळातच बोलघेवडा असल्याने, जहाजावरच्या प्रत्येकाशी त्याची मैत्री झाली. बरेच दिवस प्रवास केल्यावर त्यांना एक बेट दिसलं. खलाशानं, त्या बेटाच्या किनाऱ्यावर जहाजाचा नांगर टाकला. सारे त्या बेटावर उतरले.

'अहाहा, काय सुंदर, निसर्गरम्य, नयनरम्य बेट आहे हे! सारं सृष्टीसौंदर्य, डोळ्यांत साठवून घ्यावंसं वाटतंय. थोडावेळ या झाडाखाली आडवं व्हावं. अंग खूप मोडून गेलंय,' विचारांच्या तंद्रीत सिंदबाद एका भल्या मोठ्या वृक्षाच्या सावलीत पाय पसरून गाढ झोपला. जाग आली तेव्हा, त्याच्या लक्षात आलं, त्याच्या आसपास कोणीच दिसत नाही. धावतच तो किनाऱ्यावर पोहचला. त्याचं जहाज, त्याचा मित्र परिवार निघून गेला होता.

'असे कसे गेले सगळे मला सोडून? मी झोपलो होतो म्हणून काय झालं? मला उठवलं का नाही कोणी? हे कसले मित्र? मला संकटात टाकून खुशाल निघून गेले? सिंदबाद निराश झाला. काय करावं, त्याला कळेना. नारळाच्या झाडावर चढून तो एका उंच फांदीवर बसला. समोर अथांग पसरलेल्या समुद्रात एखादं जहाज दिसतंय का, ते त्याला बघायचं होतं. बराच वेळ तो तसाच झाडाच्या फांदीवर चढून बसला. इतका वेळ वाट पाहूनही एकही जहाज त्याच्या दृष्टीला पडलं नाही. शेवटी त्यानं खाली उतरायचं ठरवलं. उतरता उतरता, त्याला संगमरवरी दगडासारखं काहीतरी दिसलं.

'अरेच्चा, इथे संगमरवरी भला मोठा दगड कसा?' खाली उतरल्यावर सिंदबाद धावतच त्या दगडाजवळ गेला. त्यानं त्या दगडावरून हात फिरवला. त्याला तो खूपच गुळगुळीत लागला. अचानक तो उभा होता तिथे अंधारून आलं.

'यावेळी अंधार? आत्ता तर चांगली टळटळीत दुपार आहे. रात्र तर नाहीये... ही तर प्रचंड मोठ्या पक्षाची सावली आहे. ही सावली, हळूहळू खाली येत आहे. म्हणजे, म्हणजे...हा मोठा दगड म्हणजे या पक्ष्याचं अंड आहे तर! अरे... हा पक्षी परत उडायचा प्रयत्न करतोय. आपण आपल्याला याच्या पंजाला बांधून घेऊ. आता हाच आपल्याला इथून, दुसरीकडे घेऊन जाईल.'

सिंदबादनं झाडाच्या पारंब्यांनी, स्वतःला पक्ष्याच्या पंजाला बांधून घेतलं, पक्षी उंच आकाशात उडाला, सिंदबादही त्या पक्ष्याबरोबर, उंच उडाला.

> सिंदबादनं आपल्या खिशातून आणलेले हिरे, माणकं आपल्या ओंजळीत धरली.'बापरे, इतकी मौल्यवान रत्नं, मी पहिल्यांदाच पहात आहे,' चाचाजान म्हणाले. 'तुम्ही माझा जीव वाचवलात, म्हणून तुम्हाला हवी तेवढी रत्नं वेचून घ्या,' सिंदबाद म्हणाला.'सिंदबाद, तू खूप चांगला मुलगा आहेस. मी तुझा जीव वाचवला, यात तुझ्यावर फार उपकार नाही केले. माणुसकीच्या नात्यातून, ते माझं कर्तव्य होतं. तुझ्याकडेच ठेव, तुझा अनमोल ठेवा. मी त्यातलं फक्त एक काढून घेतो,' चाचाजानने त्यातलं एक रत्न काढून घेतलं.

'अरे पक्ष्या थांब आता! खाली उतर आणि मलाही उतरू दे. माझी तब्येत खूप बिघडल्यासारखी वाटते आहे. आता तू जास्त वेळ उडशील तर मी बेशुद्ध पडेन. पक्षी खाली उतरायला लागली वाटतं. मी आता स्वतःला, तिच्या पंजापासून सोडवून घेतो... हे अस्सं! जमिनीवर उडी मारतो. हे काय? मी जमिनीच्या ऐवजी कुठल्या तरी भुयारात पडलो वाटतं. मी अजून खोल खोल चाललोय,' सिंदबाद स्वतःशीच बडबडत होता. त्याने उडी मारली, ती नेमकी सापाच्या वारूळात, मोठ्या भुयारात! तिथे महाभयंकर, भला मोठा साप होता. वारूळात पूर्ण अंधार होता. मात्र, त्या मोठ्या सापाचे डोळे मात्र लाल गुंजांसारखे चमकत होते.'ए खुदा...माझ्यावर रहम कर. का मला तू एका संकटातून बाहेर काढून, दुसऱ्या संकटात ढकलतो आहेस? मी असं कुठलं पाप केलं आहे की, त्याची मला शिक्षा मिळते आहे? माझ्या हातून, चुकून एखादं पाप झालं असेल तर मला माफ कर, माफ कर!' सिंदबादनं डोळे मिटून म्हटलं.

आश्चर्य म्हणजे, तो साप गपचूप तिथून निघून गेला. त्या पक्षिणीच्या सावलीला तो घाबरला. सिंदबाद जिथे पडला होता, ते मोठं भुयार होतं. अचानक त्याला मांसाचा वास येऊ लागला. वासाच्या दिशेनं तो चाचपडत निघाला. तिथे मांसाचा मोठा तुकडा होता. मघाच्या पक्षिणीची सावली त्याला दिसली. त्यानं मांसाच्या समोरचा दगड बाजूला ढकलला. ज्यामुळे पक्षिणीला मांसाचा तुकडा स्पष्टपणे दिसेल.

तितक्यात त्याची नजर, तिथल्या जमिनीवर पडलेल्या हिरमाणकांवार गेली. अनेक बहुमूल्य हिरे, माणकं, पाचू, रत्नं तिथे विखुरली होती. सिंदबादने खिशात मावतील, एवढे हिरे-माणकं त्याने उचलून घेतली. पक्षीण तिथे आली आणि मांसाचा तुकडा तिनं आपल्या पंजात पकडला. ती उडणार इतक्यात सिंदबादनं मांसाच्या तुकड्याला पकडलं. तिने उडण्याचा पवित्रा घेतला.

'ज्या घरट्यात, तिनं आपलं भलं मोठं अंडं उबवण्यासाठी ठेवलं आहे, त्याच घरट्यात तिची इतर पिल्लंसुद्धा असतील. त्यामुळे मांसाला आपण पकडून ठेवलं तर आपण नक्कीच बंदरावर पोहचू.'

सिंदबादने मांसाच्या तुकड्याला घट्ट पकडलं. पक्षीण आकाशात उंच उडाली. पर्वत, दऱ्या, समुद्र असं पार करत अखेर ती त्या बंदराच्या वर आली. मांसाचा तुकडा गुळगुळीत असल्यामुळे सिंदबादचे दोन्ही हात निसटले. तो वरून खाली पडणार इतक्यात, कोणीतरी त्याला आपल्या हातात झेललं. 'मेलो मेलो, ओय ओय' सिंदबाद जिवाच्या आकांताने ओरडत होता. कोणीतरी झेलल्यामुळे, तो थोडक्यात वाचला. सिंदबादनं त्या व्यक्तीकडे पाहिलं. ते बगदादचे कबीर चाचा होते. त्याला आश्चर्याचा धक्काच बसला.'चाचाजान, तुम्ही इथे कसे आलात आणि काय शोधत आहात?' त्यानं विचारलं. 'अरे बाबा, मी इथे बरेचदा येतो,' चाचाजान म्हणाले.

आपल्या शेरवानीच्या खिशातून मोठा हिरा काढून त्यांनी सिंदबादला दाखवला.

'यासाठी येतो. हा मौल्यवान हिरा विकून मी पुढची दहा वर्षे श्रीमंत माणूस म्हणून मिरवेन!' कबीर चाचा म्हणाले.'तुला माहित आहे, ही पक्षीण आपल्या पिलांसाठी मांसाचा तुकडा घेऊन येते नं, त्या मांसाला एक दोन हिरेमाणकं चिकटले असतात. ते मी काढून घेतो. बगदादला गेल्यावर विकतो. त्यातून मला रग्गड पैसा मिळतो. म्हणून श्रीमंत व्यापारी अशी माझी ख्याती आहे,' कबीर चाचा पुढे म्हणाले. सिंदबादनं आपल्या खिशातून आणलेले हिरे, माणकं आपल्या ओंजळीत धरली.'बापरे, इतकी मौल्यवान रत्नं, मी पहिल्यांदाच पहात आहे,' चाचाजान म्हणाले. 'तुम्ही माझा जीव वाचवलात, म्हणून तुम्हाला हवी तेवढी रत्नं वेचून घ्या,' सिंदबाद म्हणाला.'सिंदबाद, तू खूप चांगला मुलगा आहेस. मी तुझा जीव वाचवला, यात तुझ्यावर फार उपकार नाही केले. माणुसकीच्या नात्यातून, ते माझं कर्तव्य होतं. तुझ्याकडेच ठेव, तुझा अनमोल ठेवा. मी त्यातलं फक्त एक काढून घेतो,' चाचाजानने त्यातलं एक रत्न काढून घेतलं. 'चल आता, माझ्या जहाजातून बगदादला, आपल्या गावाला परत जाऊ या. जहाजावर गेल्यावर, तू इथे कसा पोहचलास हे सर्व मला सांग,' चाचाजान बरोबर सिंदबाद त्यांच्या जहाजावर पोहोचला. आपले दोन्ही हात कोपरापासून वर करून सिंदबादनं देवाचे आभार मानले.

## संघ हीच जीवनगाथा

सुरेखा काणे/९९६०० ५३५२१

परमपूजनीय डॉ. हेडगेवारांनी जगायचे कसे आणि कशासाठी या विषयाचा प्राणमंत्र दिला. त्यांनी आधी कृती मग, विचार मांडला म्हणून त्यांना क्रांतदर्शी म्हणतात.

आज 'द काश्मीर फाइल्स', 'पावनखिंड','धुरंधर' इत्यादी चित्रपट प्रदर्शित होऊ शकले कारण आजचे पंतप्रधान संघ विचारांचे आहेत. यातील एक चित्रपट काश्मीरमधील हिंदूंचे क्रूर हत्याकांड दर्शवितो. तेव्हा १९९० साली संघ स्वयंसेवकांनी आहार, विहार आणि उपचार आदि कामात खूप मदत केली. असे का घडले? हे डॉक्टरांच्या विचारांतून कळते. ते नेहमी सांगायचे, आपण आपली ओळख, आपली संस्कृती, आपला इतिहास, आपला पुरुषार्थ, आपले सामर्थ्य विसरलो आहोत. किंबहुना, सामर्थ्य आठवले तरी ते गुंडाळून ठेवले आहे. दुबळे बनणे आपण पसंत केले आहे. आपला हिंदू समाज रोगी बनला आहे. डॉक्टरांच्या जीवनकाळात पण हिंदू रोगी होता व आजही आहे. हे दुबळेपण घालवण्याचा प्रयत्न करू या. घटनेच्या ज्या कलमामुळे फुटीरतावादी विचार बळावले होते ते ३७० कलमही रद्द झाले आहे. एक देश-एक निशान-एक प्रधान ही घोषणा प्रत्यक्षात आली आहे. आपण एक आहोत. राष्ट्र आणि समाज हे वेगळे नाहीत तर एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, हा भाव म्हणजे डॉ. हेडगेवार यांचा प्राणमंत्र होता. आक्रमक पवित्रे घेणाऱ्या परधर्मीयांच्या शक्तीपुढे सदैव भीतीग्रस्त राहणाऱ्या असंघटित हिंदूंमध्ये स्वसंरक्षणाचे सामर्थ्य निर्माण करण्याची आवश्यकता डॉक्टरांना वाटू लागली होतीच. त्यासाठीच संघात वैचारिक व शारीरिक शक्ती या दोन्ही शक्तींची उपासना होते.

आपल्या भारत मातेच्या स्वातंत्र्याच्या अमृत




महोत्सवानिमित्त आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून पाच प्रण सांगितले.

१. विकसित भारतासाठी कटिबद्ध व्हा.

२. गुलामी मनोवृत्तीच्या जोखडातून मुक्त व्हा.

३. आपल्या विरासतीवर गर्व करा. ती चिरपुरातन आणि नित्य नूतन आहे.

४. एक भारत श्रेष्ठ भारत करण्याची प्रतिज्ञा करा. त्यासाठी एकता अंगी बाणवा.

५. नागरिकांचे कर्तव्य, हक्क आणि कर्तव्य एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, हे ध्यानी धरा.

सर्व भारतीयांनी या पाच प्राणशक्तीचा उपयोग करावा, अशी त्यांनी आग्रहाची विनंती केली. हे संकल्प ऐकताना मनोमन असे वाटले की, हेच संकल्प घेऊन डॉक्टरजी स्वतः मार्गस्थ होत होते व मार्गदर्शन करत होते. विक्राळ प्रश्न व त्याची सोडवणूक यावरच डॉक्टरजी अखंड मंथन करत असत. आज पंतप्रधान मोदी डॉक्टरजींच्या रूपात बोलतात. या दोघांची हालचाल पाहिली की, समर्थ रामदासांचा अभंग आठवतो.

**भाग्यवंत नर यत्नासी तत्पर।**
**अखंड विचार चाळणेचा।**
**चाळणेचा यत्न यत्नाची चाळणा।**
**अखंड शहाणा तोचि एक॥**

# घट मांडताना...

देवघरात आंब्याची पाने, कुंकू आणि नारळ ठेवून तांदूळ जमवून खोलगट भागात घट ठेवला जातो. त्यावर स्वस्तिक आणि ॐ अशी मंगल चिन्हे अंकित असतात. घट हे नवसर्जनाचे, उत्पत्तीचे, जलाचे आणि योनीचे प्रतिक आहे. यातील काही प्रतिकांचा आपण इथे विचार करू या.

आश्वलायनगृह्यसूत्रात(४.५.२) घटाच्या आकाराच्या पण पुरुष-स्त्री खुणांनी युक्त असलेल्या मातीच्या भांड्यात मृताच्या अस्थी पुरण्याचा उल्लेख येतो. याचा उपोद्बलक पुरावा ताम्रपाषाण युगीन स्थळ असणाऱ्या इनामगावच्या उत्खननात मिळतो.

पृथ्वीराज धवड/९१३०८३९७८०

एका लहान मुलाचे अस्थिकुंभात दफन केलेले इनामगाव इथे आढळून आले आहे. लहान मुलांना दोन कुंभात घालून पुरले जाई. दोन्ही कुंभ एकाला एक तोंड लावून ठेवत. त्यापैकी एक लहान आणि दुसरा मोठा असे. लहान कुंभात डोके आणि मोठ्यात शरीर ठेवत. डोके उत्तरेकडे आणि दक्षिणेकडे पाय करून दफन करत. मुलाचे शव कुशीवर, पाय पोटाशी दुमडून, गर्भावस्थेत असल्याप्रमाणे ठेवीत. तो जीव पुन्हा मातेच्या उदरात गेला, अशी त्यामागे भावना असावी. त्याचा पुनर्जन्म व्हावा अशी श्रद्धा असावी, असे मत डॉ. म.के.ढवळीकरांचे आहे. यासंबंधीची एक वाराणसीत ऐकलेली लोककथा डॉ.सदाशिव डांगे यांनी आपल्या घट आणि हिरण्यगर्भ या लेखात दिली आहे. ही लोककथा सीतेच्या जन्मासंबधीची आहे. 'रावणाने ऋषींना मारले आणि त्यांच्या रक्ताने एक घडा भरून



ठेवला. रावणाची दहशत इतकी की, त्याच्या आवाजाने स्त्रियांचे गर्भ गळून पडत. एकदा मंदोदरी आणि रावणाची बहीण गप्पा मारीत होत्या. मंदोदरी म्हणाली की, रावण अलिकडे हसत नाही, बोलत नाही.' त्यावर रावणाची बहीण म्हणाली,'बरं मी प्रयत्न करते.' त्यावर तिने रावण आल्यावर काही तरी गमतीची गोष्ट सांगितली आणि रावण जोराने हसला. तो इतका जोराने हसला की, त्या रक्ताने भरलेल्या घड्यातून एक कन्या जन्मून बाहेर आली. तीच सीता!' येथे घट गर्भस्थानाचे स्पष्ट प्रतीक आहे.

ऋग्वेदात कुंभ, पूर्ण कलश, भद्रा कलश असे उल्लेख आहेत. याशिवाय, द्रोण, कलश पात्र, सोमधान, चमस आणि कोश असे पर्यायवाची शब्द ऋग्वेदात आढळतात, असे काही विद्वानांचे मत आहे. अथर्ववेदाच्या एका मंत्रात स्त्रियांना यज्ञाच्या रक्षणार्थ पूर्ण कुंभ आणण्याचा आदेश दिला आहे. स्कंदपुराणात विवाह प्रसंगी उपयोगी चिन्हाची यादी दिली आहे त्यात पूर्ण कलशाचा उल्लेख येतो.



**घट हे समुद्र म्हणजेच जलाचेही प्रतिक मानले जाते. ग्रहण लागायच्या आधी घरात चार जलपूर्ण घट ठेवावे. त्याचे कारण म्हणजे ते चार समुद्रांचे प्रतिक आहे. नवरात्रात पहिल्या दिवशी घटस्थापना होते. घटासमोर अष्टौप्रहर दिवा जळत असावा, असे नियम असतात. घट हा देवीच्या मातृत्वाचे आणि सर्जनशिलतेचे प्रतिक आहे.**

तसेच, पूर्ण कलश हे लक्ष्मीचे प्रतिकसुद्धा आहे. भरहुत येथील शुंगकालीन स्तुपात पूर्ण कलशाचे अंकन आहे. या कलशाचे पुष्प आणि पानांनी अंकन केलेले आहे. महत्वाचे म्हणजे भरहुत इथून मिळालेल्या तीन शिला फलक असे आहेत ज्यात पूर्ण कलशातून पुष्पावर लक्ष्मी स्थित आहे. बौध्द धर्मातील कुबेरा सारखाच असणारा जम्भल हा आपल्या हातात फळ आणि मुंगुस घेऊन असतो. जम्भल बसलेला असताना त्याच्या पायाशी लवंडलेला कुंभ असतो, त्यामधून धनराशी बाहेर पडताना दिसतात. त्यामुळे कुंभ/कलश हे धनाचे प्रतिक असलेले दिसते .

नागार्जुनकोंडा येथे चुन्याच्या दगडापासून निर्मित कलश प्राप्त झाला आहे. पल्लवयुगीन कलेत पूर्ण कलशाचे अंकन मंदिराच्या शीर्षस्थानी झाले आहे. चालुक्य काळातील मंदिरात पूर्ण कलश हे मंदिराच्या द्वारावर अंकित असलेले दिसतात. बौद्ध आणि जैन धर्मातसुद्धा अष्ट मंगलांचे महत्व आहे. जैनांचे तिलोयपणत्ती यात अष्ट मंगलांची यादी दिली आहे. त्यात कलशाचा समावेश आहे.

घट हे समुद्र म्हणजेच जलाचेही प्रतिक मानले जाते. ग्रहण लागायच्या आधी घरात चार जलपूर्ण घट ठेवावे. त्याचे कारण म्हणजे ते चार समुद्रांचे प्रतिक आहे. नवरात्रात पहिल्या दिवशी घटस्थापना होते. घटासमोर अष्टौप्रहर दिवा जळत असावा, असे नियम असतात. घट हा देवीच्या मातृत्वाचे आणि सर्जनशिलतेचे प्रतिक आहे. घटाचे प्रतिकात्मक महत्व असे व्यापक आहे. देवघरातील घटाचे असणारे उद्देश अशाप्रकारे समजून घेतले पाहिजे.

# देवा भाऊ कृषी माऊली सोहळ्यात १५० शहरी महिलांना कृषी किटचे मोफत वाटप



परभणी,/प्रतिनिधी:- भारतीय जनता पार्टी परभणी महानगर महिला मोर्चाच्या वतीने महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त ''देवा भाऊ कृषी माऊली सोहळा'' आयोजित करण्यात आला. या उपक्रमांतर्गत परभणी शहरातील रामकृष्ण नगर येथे १५० शहरी महिलांना बागकाम व भाजीपाला लागवडीसाठी कृषी किटचे मोफत वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेत्या डॉ. मीनाताई परतानी या होत्या. प्रमुख उपस्थितीमध्ये भाजपा परभणी महानगर जिल्हाध्यक्ष श्री. शिवाजीभाऊ भरोसे, शहर जिल्हा महामंत्री श्री. भालचंद्रजी गोरे, लताताई वाकळे, सौ. मीनाताई वडपुरकर, सौ. तिरुमला खिलारे, नगरसेविका सौ. सुशीलाताई थोरात, नगरसेविका सौ. सपनाताई जुक्टे, सौ. गिरीजा अजेगावकर, डॉ. मंजुषा नरवाडकर, सीमाताई धुमाळ, सौ. प्रभावती अन्नपूर्णे, सौ. विजयाताई कातकडे, रोहिणीताई हलगे, प्रा. रमाताई शेजावळे, प्रा. ऋतुजा जोशी, सौ. रुपाली ठाकरे, डॉ. नम्रता पाटील, सौ. बालिका सुरनार, सौ. सुलभा धुळे, सौ. अपर्णा जोशी, सौ. छायाताई मोगले तसेच ज्येष्ठ नागरिक सुधाकर काका डावरे व सौ. वर्षाली सुधाकर डावरे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या संयोजिका तथा प्रभारी, मनपाच्या माजी गटनेत्या मंगलताई मुदगलकर यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन प्रा. ऋतुजा जोशी यांनी केले, तर महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा मनीषाताई जाधव यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी शहर जिल्हा महामंत्री भालचंद्रजी गोरे यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, महिला शेतकरी व गृहिणींना आधुनिक शेतीचे ज्ञान, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि शाश्वत शेतीची दिशा देण्यासाठी आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम अत्यंत उपयुक्त असून, शहरातील महिलांना घरच्या घरी भाजीपाला व फळझाडांची लागवड करण्यासाठी तो प्रेरणादायी ठरेल.

कार्यक्रमात वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे निवृत्त हॉर्टिकल्चर अधिकारी सुधाकर काका डावरे यांनी फळझाडे, भाजीपाला व विविध फुलझाडांची लागवड, मातीची योग्य तयारी, पालापाचोळ्यापासून सेंद्रिय खत तयार करण्याची पद्धत याविषयी प्रात्यक्षिकासह सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच त्यांच्या निवासस्थानी विकसित केलेल्या बागेची पाहणी करून महिलांना उपलब्ध जागेत भाजीपाला व फळझाडांची लागवड करण्याचे आवाहन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रुपाली ठाकरे, अपर्णा जोशी, सीमाताई धुमाळ, छायाताई मोगले, दीपाली वाघ, अर्चना जैन, उषा चव्हाण, प्रियांका चव्हाण, उषा पाटोळे, कीर्ती सिरसागर, सुनीता घुगे, रेखा पाईकराव, पूजा मोरे, मंगल वाघमारे तसेच महिला मोर्चाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## मोरे यांची जिल्हा प्रमुखपदी निवड

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी जिल्ह्यातील युवा कुस्तीप्रेमी आणि सामाजिक कार्यकर्ते पैलवान संतोष उर्फ अमोल सोनाजी मोरे यांची महाराष्ट्र कुस्ती संघटनेच्या परभणी जिल्हाप्रमुखपदी निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र कुस्ती संघटनेचे पैलवान संग्राम कांबळे यांनी नुकतीच ही घोषणा केली. पैलवान मोरे यांनी कुस्ती क्षेत्राबरोबरच सामाजिक क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य केले आहे. जगदंब प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष म्हणून त्यांनी परभणी येथे जगदंब कुस्ती संकुल उभारण्याचा संकल्प साकारत जिल्ह्यातील पारंपरिक कुस्तीला नवी दिशा देण्याचे काम हाती घेतले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली दरवर्षी निकाली कुस्त्यांच्या भव्य मैदानांचे आयोजन केले जाते. तसेच विविध सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रम, रक्तदान शिबिरे, गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप आदी उपक्रम सातत्याने राबविण्यात येतात. याशिवाय होतकरू पैलवानांना खुराकासाठी मानधन व आर्थिक मदत देऊन त्यांना प्रोत्साहन देण्याचे कार्यही ते करत आहेत.

## संक्षिप्त वृत्त...

### जिल्हा वकील संघातर्फे विद्यार्थी आंदोलनास पाठींबा

**परभणी,/प्रतिनिधी :** नवी दिल्लीतील जंतर मंतर मैदानावर विद्यार्थ्यांनी सुरु केलेल्या आंदोलना दरम्यान दिल्ली पोलिसांनी केलेल्या अमानुष लाठी हल्ल्याचा परभणी जिल्हा वकील संघाच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला.

वकील संघाचे अध्यक्ष ॲड. साहेबराव अडकिणे, ॲड. विनोद रसाळ, ॲड. मदन बोबडे, ॲड. रवि गायकवाड, ॲड. एस.एस. पवार, ॲड. राजेश चव्हाण, ॲड. माधुरी क्षीरसागर, ॲड. सुवर्णा देशमुख, ॲड. अनिल मोगल, ॲड. विजय काळे, ॲड. कैलास पवार, ॲड. लक्ष्मण काळे, ॲड, सुमन उफाडे, ॲड. नवीन छत्रपती, ॲड. माणिक खुपसे, ॲड. सोनकांबळे, ॲड. अंभोरे यांच्यासह अन्य पदाधिकारी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. वकील संघाच्या वतीने जिल्हा प्रशासनास निवेदन सादर करण्यात आले.

### ७ लाखांच्या जबरी चोरीचा बनाव उघड; स्थानिक गुन्हे शाखेची काही तासांत कारवाई : पूर्वनियोजित कटाचा पर्दाफाश; एक आरोपी अटकेत, ४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ७ लाख रुपयांच्या कथित जबरी चोरीच्या गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या काही तासांत छडा लावत हा प्रकार पूर्वनियोजित कट असल्याचे उघड केले आहे. या प्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली असून त्याच्याकडून ३ लाख ५० हजार रुपये रोख रक्कम आणि एक मोबाईल असा सुमारे ४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, परतूर येथील दहिवाल ज्वेलर्समध्ये काम करणारा प्रथमेश शहाणे याने बुधवारी (दि. २२) परभणी ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. दुकानमालकाने बँकेत जमा करण्यासाठी दिलेली ७ लाख रुपयांची रक्कम घेऊन तो परभणीकडे येत असताना जळगाव परिसरात चार अज्ञात व्यक्तींनी चाकूचा धाक दाखवून रक्कम लुटल्याचा दावा त्याने केला होता. याप्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक पंकज कुमावत आणि अप्पर पोलीस अधीक्षक तानाजी चिखले यांच्या निर्देशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांच्या पथकाने तातडीने तपास सुरू केला. तांत्रिक विश्लेषण, गोपनीय माहिती आणि घटनास्थळावरील तपासादरम्यान फिर्यादीने साथीदारांच्या मदतीने जबरी चोरीचा बनाव रचल्याचे निष्पन्न झाले.

तपासात इमरान शेख सत्कार शेख (रा. सातोना, ता. परतूर) याच्यासह तीन जणांचा सहभाग उघड झाला. इमरान शेख याला ताब्यात घेऊन त्याच्याकडून ३ लाख ५० हजार रुपये रोख रक्कम आणि एक मोबाईल असा एकूण सुमारे ४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. उर्वरित आरोपींचा शोध स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, अप्पर पोलीस अधीक्षक तानाजी चिखले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक चंदनसिंह परिहार, गणेश सवंडकर तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

### जिंतूरमध्ये महाराष्ट्र बंदला प्रतिसाद : वंचित बहुजन युवा आघाडीतर्फे तहसीलदारांना निवेदन

**जिंतूर,/प्रतिनिधी:** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी दिलेल्या महाराष्ट्र बंदच्या हाकेला जिंतूर शहरात गुरुवारी (दि. २३) संमिश्र प्रतिसाद मिळाला. यावेळी वंचित बहुजन युवा आघाडीच्या वतीने तहसीलदारांमार्फत पंतप्रधानांच्या नावे निवेदन देण्यात आले.

निवेदनात जंतरमंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवरील कथित पोलिस कारवाईची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्यावा, नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणातील मृत विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत द्यावी तसेच विद्यार्थी आंदोलनांदरम्यान दाखल झालेले गुन्हे मागे घ्यावेत, अशा मागण्या करण्यात आल्या. हे निवेदन युवा जिल्हा महासचिव सतीश वाकळे यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आले. यावेळी इस्माईल पहेलवान, सय्यद फेरोज, अनिल गाडेकर, नगरसेवक अकबर कुरेशी, मास भाई, वसीम पठाण, रहीम पहेलवान, मकसूद पठाण, रियाज भाई, जुनेद भाई, धम्मपाल, वकील, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)चे गंगाधर घुगे, शरद चव्हाण, गणेश गुलाबराव काकडे यांच्यासह वंचित बहुजन युवा आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

दरम्यान, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस निरीक्षक नामदेव मिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

### मानवतमध्ये बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद

**मानवत,/प्रतिनिधी-** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी सर्व पक्ष व संघटनांच्या सहकार्याने दिलेल्या महाराष्ट्र बंदच्या हाकेला गुरुवारी (दि. २३) मानवत शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शहरातील व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने आपली प्रतिष्ठाने बंद ठेवून बंदमध्ये सहभाग नोंदविला. यावेळी नायब तहसीलदार सौ. अंभोरे यांना निवेदन देण्यात आले. जंतर-मंतर, नवी दिल्ली येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मागण्या तातडीने मान्य कराव्यात तसेच विद्यार्थ्यांवरील कथित लाठीचार्ज प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. निवेदनावर वंचित बहुजन आघाडीचे परभणी उपजिल्हाध्यक्ष नंदकिशोर कुमावत यांच्यासह आनंद भदर्गे, राजूभैय्या खारत, प्रभाकर कदम, गोविंदा घाडगे, दीपक ठेंगे, व्यंकटराव चौधरी, धम्मपाल सोनटक्के, संपत पंडित, शेख मुस्ताक, आशेफ खान, मोहन बारहाते, महेंद्र ठेंगे, चंद्रकांत मगर, रवि पंडित, फकिरा सोनवणे, खयूम बागवान, महबूब मनसुरी, सय्यद समीर खान, इलियास पठाण आणि राजेभाऊ होगे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## आषाढी एकादशीनिमित्त पूर्णेत आज भव्य पालखी व रिंगण सोहळा

पूर्णा,/प्रतिनिधी- आषाढी एकादशीच्या पावन पर्वाचे औचित्य साधून स्वातंत्र्य सैनिक दाजीसाहेब कदम पाटील प्रतिष्ठान, पूर्णा यांच्या वतीने २५ जुलै शनिवार रोजी शहरात भव्य पालखी व रिंगण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाची माहिती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा शिवसेना जिल्हाप्रमुख विशाल कदम यांनी दिली.



पालखी सोहळयाला सकाळी ८ वाजता नवा मोंढा बाजार, पूर्णा येथून प्रारंभ होणार आहे. टाळ-मृदंगाच्या निनादात, हरिनामाच्या अखंड गजरात आणि वारकरी दिंड्यांच्या उत्साहपूर्ण सहभागाने पालखी शहरातील प्रमुख मार्गाने मार्गस्थ होईल. नवा मोंढा येथून सुरू होणारी पालखी महात्मा बसवेश्वर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, महादेव मंदिर, श्री गुरु बुद्धीस्वामी मठ संस्थान मार्गे जुना मोंढा येथे पोहोचेल. यानंतर तेथे पारंपरिक रिंगण सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे.

आषाढी एकादशीच्या दिवशी पंढरपूरच्या वारीत प्रत्यक्ष सहभागी होणे अनेक भाविकांना शक्य होत नसल्याने, त्यांना आपल्या शहरातच वारकरी परंपरेचा आणि विठ्ठलभक्तीचा अनुभव मिळावा या उद्देशाने हा उपक्रम मागील अनेक वर्षांपासून सातत्याने राबविण्यात येत आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख विशाल कदम यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात येणारा हा सोहळा पूर्णा शहरातील धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य भाग बनला आहे. यंदाच्या पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या सर्व माता-भगिनींना महादेवाची आकर्षक मूर्ती भेट म्हणून प्रदान करण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे महिला भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग अपेक्षित असून, शहर व परिसरातील वारकरी, युवक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक शिवसेना जिल्हाप्रमुख विशाल कदम यांनी केले केले आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त मानवतमध्ये भव्य रक्तदान शिबिरास प्रतिसाद

**मानवत,/प्रतिनिधी:** मानवत : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने मानवत शहर व ग्रामीण भागात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

''रक्तदान श्रेष्ठदान, जीवनदान'' या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे अनेक गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. शिबिरास जिल्हा परिषद सदस्य परमेश्वर निर्वल व नगरसेवक शैलेश कत्रुवार यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी भाजप तालुकाध्यक्ष हरिभाऊ निर्मळ, शहराध्यक्ष संदीप हंचाटे, जिल्हा उपाध्यक्ष अनंत गोलाईत, युवा मोर्चा अध्यक्ष ज्ञानेश्वर धोपटे, विद्यार्थीनाथ घागरे, विठ्ठल मगर, माणिक मोगरे, राजेश मंत्री, विठ्ठल गायकवाड, मोहन कापसे, बालाजी साखरे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. रक्तदान शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी युवा मोर्चा अध्यक्ष ज्ञानेश्वर धोपटे यांनी विशेष परिश्रम घेतले. शिबिरात सहभागी झालेल्या सर्व रक्तदाते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे मान्यवरा



### पत्रकार संघाकडून एसआयआर नोंदणी

**परभणी,/प्रतिनिधी-शासनाच्या वतीने मानवत येथील रेणुका मंगल कार्यालयात बुधवार, दि. २२ रोजी आयोजित छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिरात मानवत तालुका पत्रकार संघाच्या वतीने मतदारयादी विशेष सखोल फेरतपासणी संदर्भात जनजागृतीचा उपक्रम राबविण्यात आला.**

**यावेळी मानवत तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रसाद जोशी, संजय नाईक, शाम झाडगावकर, गोपाळ लाड, दिगंबर बाकळे आणि सचिन मगर उपस्थित होते.**



**मानवत- शासनाच्या वतीने मानवत येथील रेणुका मंगल कार्यालयात बुधवार, दि. २२ रोजी आयोजित छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिरात मानवत तालुका पत्रकार संघाच्या वतीने मतदारयादी विशेष सखोल फेरतपासणी संदर्भात जनजागृतीचा उपक्रम राबविण्यात आला.**

# शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी वंचित बहुजन युवा आघाडीचे जिंतूर तहसीलवर निवेदन

जिंतूर,/प्रतिनिधी-: वंचित बहुजन युवा आघाडी, जिंतूरच्या वतीने केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात तसेच दिल्लीतील जंतरमंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित पोलिस कारवाईचा निषेध व्यक्त करत पंतप्रधानांच्या नावे तहसीलदार, जिंतूर यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, दिल्लीतील जंतरमंतर येथे शांततापूर्ण व लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर करण्यात आलेला कथित लाठीचार्ज आणि बळाचा वापर हा निषेधार्ह असून लोकशाही मूल्यांच्या विरोधात आहे. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला शांततापूर्ण आंदोलन करण्याचा अधिकार दिलेला असताना अशा आंदोलनांवर बळाचा वापर करणे अयोग्य असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश (बाळासाहेब) आंबेडकर यांनी दिलेल्या २३ जुलै २०२६ रोजीच्या महाराष्ट्र बंदला जिंतूर तालुक्यातील वंचित बहुजन आघाडीचा संपूर्ण पाठिंबा असल्याचेही जाहीर करण्यात आले. निवेदनाद्वारे केंद्र सरकारकडे केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा तात्काळ राजीनामा घेण्याची मागणी करण्यात आली. तसेच जंतरमंतर येथील आंदोलनात सहभागी विद्यार्थ्यांवर कथित लाठीमार करणाऱ्या संबंधित पोलिस कर्मचाऱ्यांना निलंबित करण्याची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय, नीट () परीक्षा पेपरफुटी प्रकरणाशी संबंधित आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी एक कोटी रुपयांची आर्थिक मदत देण्यात यावी तसेच देशभरातील विद्यार्थी आंदोलनांदरम्यान विद्यार्थ्यांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे तात्काळ मागे घेण्यात यावेत, अशीही मागणी निवेदनात करण्यात आली आहे. हे निवेदन युवा जिल्हा महासचिव सतीश वाकळे यांच्या व कांग्रेस पक्षाचे इस्माईल पहेलवान, सय्यद फेरोज भाई, अनिल गाडेकर, नगर सेवक अकबर कुरेशी, मास भाई, वसीम पठाण, रहीम पहेलवान, मकसूद पठाण, रियाज भाई, जुनेद भाई, धम्मपाल, वकील,उबाठाचे गंगाधर घुगे इत्यादीच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आले. यावेळी शरद चव्हाण, गणेश गुलाबराव काकडे यांच्यासह वंचित बहुजन युवा आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. निवेदनाची प्रत मा.पंतप्रधान, भारत सरकार यांच्या नावे तहसीलदार, जिंतूर यांच्यामार्फत पाठविण्यात आली असून मागण्यांवर तातडीने निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली आहे या वेळी पोलीस निरीक्षक नामदेव मिंदे यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# आरक्षण उपवर्गीकरणाविरोधात नांदेडमध्ये ९ ऑगस्ट रोजी महामोर्चा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २४ जुलै -**

राज्य सरकारने मागच्या एक वर्षापासून राज्यातील अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या प्रक्रियेला अनुसूचित जातीतील एकूण ५९ जाती मोठ्या प्रमाणात विरोध करत आहेत.या विरोधाचा एक भाग म्हणून नांदेड जिल्ह्यामधील सर्व अनुसूचित जातीतील लोकांनी एकत्र येऊन ९ ऑगस्ट २६ रोजी नांदेड येथे महामोर्चाचे आयोजन केले आहे.

अनुसूचित जातीतील आरक्षण उपवर्गीकरण करण्याच्या प्रक्रियेला सुरुवात केली आहे. त्या बाबतीत राज्यातील अनेक जिल्ह्यातुन या आरक्षण उपवर्गीकरणास मोर्चाच्या माध्यमातून विरोध दर्शविण्यात आलेला आहे. याचाच एक भाग म्हणून नांदेड शहरात दिनांक ९ ऑगस्ट २०२६ रोजी अनुसूचित जातीतील ५९ जातींनी एकत्र येऊन महामहामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळी ११.00 वाजता महात्मा फुले पुतळा आयटीआय चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय या मार्गाने मोर्चा काढण्यात येणार आहे.

अनुसूचित जातीतील उपवर्गीकरणामुळे भारतीय संविधानातील कलम ३४१ ला बाधा पोहोचत आहे. संविधानातील कलम ३४१ हे अनुसूचित जातीतील आरक्षणाचे संरक्षण करत असून या आरक्षणामध्ये कुठलाही बदल करण्यासाठी राष्ट्रपती व संसदेची पूर्वपरवानगी अनिवार्य आहे. राज्य सरकारला अनुसूचित जातीतील आरक्षणामध्ये कुठलाही बदलाव करण्याचा अधिकार भारतीय संविधान देत नाही तसेच २५ ऑगस्ट २०२५ रोजी सुप्रीम कोर्टाने उपवर्गीकरणासंदर्भात दिलेला निर्णय हा राज्य सरकारला बंधनकारक नाही.



राज्य सरकारने उपवर्गीकरणाची प्रक्रिया तर सुरू केली पण अद्याप पर्यंत राज्य सरकारने इम्पेरियल डाटा संकलित केला नाही. तसेच राज्य सरकारने एक सदस्य न्यायमूर्ती बदल समिती गठीत केली होती ही समिती सुद्धा असविधानिक असून अनुसूचित जातीच्या आरक्षणाचा कुठलाही निर्णय हा अनुसूचित जाती आयोगामार्फत अहवाल तयार करून घेण्यात येण्याची संविधानात तरतूद आहे.

एक सदस्य बदर समितीने जो अहवाल राज्य सरकारकडे सादर केला तो अहवाल आतापर्यंत जनतेसाठी खुला न करता एप्रिल महिन्यामध्ये यासंदर्भात मोठ्या प्रमाणात हरकती व सूचना राज्य सरकारने मागवल्या होत्या. हे सुद्धा नियमबाह्य असून राज्य सरकारने कोणत्या आधारावर या हरकती व सूचना उपवर्गीकरणा संदर्भात मागवल्या आहेत याची स्पष्टता राज्य सरकारने अद्याप पर्यंत केलेली नाही. या सर्व प्रक्रियेवरून असे वाटते की, राज्य सरकार अनुसूचित जातीचे आरक्षणाचे उपवर्गीकरण बेकायदेशीरपणे अनुसूचित जातीवर थोपवण्यासाठी प्रयत्न करत आहे.

सर्व प्रक्रियेला विरोध म्हणून मागच्या तीन महिन्यापासून राज्यभर आरक्षणाच्या उपवगीकरणा विरोधात मोठ्या प्रमाणात आंदोलन होत आहेत. याच आंदोलनाचा भाग म्हणून नांदेड जिल्ह्यात ९ ऑगस्ट २०२६ रोजी जिल्ह्यातील ५९ अनुसूचित जातीच्या लोकांचा भव्य मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. मोर्चा यशस्वी करण्यासाठी आरक्षण उपवर्गीकरण विरोधी कृती समिती जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये वस्त्यांमध्ये बैठकीचे सध्या आयोजन करत असून अनुसूचित जातीच्या लोकांना उपवर्गीकरण हे आरक्षणाला कसा धोका निर्माण करत आहे. या संदर्भात जनजागृती ही या बैठकी मार्फत करण्यात येत आहे.

९ ऑगस्ट रोजी आयोजित मोर्चामध्ये प्रमुख उपस्थिती म्हणून आनंदराज आंबेडकर माननीय डॉ. भीमराव आंबेडकर ,आमदार राजकुमार बडोले, बबनराव घोलप, एड. सुरेश माने सर हे उपस्थित राहणार आहेत.

अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरणास ठाम व संविधाननिष्टविरोध हा ५९ अनुसूचित जातींचा राहणार आहे. अनुसूचित जातीच्या घटनात्मक आरक्षणाचे संरक्षण करून त्याची अखंडता कायम राखणे, अनुसूचित जातीतील फूट पाडणाऱ्या परस्पर विषयी द्वेष निर्माण करणाऱ्या कोणत्याही प्रयत्नाला आमचा ठाम विरोध राहणार आहे. राज्यातील अनुसूचित जातीमध्ये एकोपा व सलोखा कायम ठेवणे या आमच्या ठाम भूमिका आहेत

तसेच या मोर्चाच्या पूर्व परवानगीसाठी आरक्षण व उपवर्गीकरण विरोधी कृती समिती च्या सदस्यांनी जिल्हाधिकारी तसेच पोलीस अधीक्षक यांची भेट घेऊन मोर्चाची पूर्व सूचना दिली आहे हा मोर्चा ९ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता महात्मा फुले पुतळा आयटीआय चौक इथून निघून जिल्हाधिकारी कार्यालय येथे सभेमध्ये रूपांतर होऊन विसर्जित करण्यात येणार आहे. असे यावेळी प्रास्ताविक डॉ. हर्षवर्धन दवणे, भंतेजी पंय्याबोधी, रमेश सोनाळे, स्वप्नील नरबाग, इंजि. भारतकुमार कानिंदे, मनीष कावळे, प्रा. राजू सोनसळे, सुखदेव चिखलीकर, मनोज वाघमारे, नामदेव फुलपगार, मनीष कावळे, इंजि, अशोक गायकवाड, कुलदीप राक्षसमारे, अतिश ढगे, प्रकाश दिपके, राहुल चिखलीकर, इत्यादी पत्रकार परिषदेत उपस्थित होते. मोर्चाच्या अनुषंगाने कृती समितीच्या मार्फत विविध उपाय योजनेचे नियोजन करण्यात येत आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस अंध विद्यालयात साजरा

**बाऱ्हाळी-** भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभर विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्याच पार्श्वभूमीवर युवा



सामाजिक कार्यकर्ते महादेव रंगा यांच्या पुढाकारातून एकलव्य अंध विद्यालयात अंध विद्यार्थ्यांसमवेत वाढदिवस साजरा करत सामाजिक बांधिलकीचा प्रेरणादायी संदेश देण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात देवेंद्र फडणवीस यांच्या निरोगी, दीर्घायुषी व यशस्वी सार्वजनिक जीवनासाठी सदिच्छा व्यक्त करून करण्यात आली. त्यानंतर अंध विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत वाढदिवसाचा केक कापण्यात आला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद खुलावा या उद्देशाने विविध मनोरंजक खेळ, समूह उपक्रम आणि संवादात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनीही या उपक्रमात मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. खेळ, हास्य आणि आनंदाने संपूर्ण विद्यालय परिसर भारावून गेला. यावेळी बोलताना महादेव रंगा म्हणाले, वाढदिवस म्हणजे केवळ शुभेच्छांचा दिवस नसून समाजातील गरजू, वंचित आणि दिव्यांग बांधवांसोबत आनंद वाटून घेण्याची संधी आहे. देवेंद्र फडणवीस यांनी नेहमीच समाजातील प्रत्येक घटकाच्या विकासासाठी काम केले आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त अंध विद्यार्थ्यांसोबत वेळ घालवून त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणे, ह्याच त्यांच्या जन्मदिनी खऱ्या शुभेच्छा

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांनी एकमुखाने देवेंद्र फडणवीस यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या तसेच त्यांच्या उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि अखंड जनसेवेसाठी प्रार्थना केली.

## गिरजाई प्री-प्रायमरी स्कूलमध्ये आषाढी एकादशी उत्साहात साजरी

**इस्लापूर** -आषाढी एकादशीचे औचित्य साधून गिरजाई प्री-प्रायमरी स्कूलमध्ये एलकेजी, यूकेजी व नर्सरीच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांसाठी



पारंपरिक आणि भक्तिमय वातावरणात आषाढी एकादशीचा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना वारकऱ्यांच्या पारंपरिक वेशभूषेत शाळेत येण्याचे आवाहन करण्यात आले होते. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी टाळ, मृदुंग, तुळशीमाळ, फेटे, भगवे झेंडे अशा आकर्षक वेशभूषेसह वारकरी, तसेच भगवान विठ्ठल आणि माता रुक्मिणी यांच्या भूमिका अत्यंत सुंदरपणे साकारल्या. विद्यार्थ्यांनी भक्तिरसात रंगून पारंपरिक रिंगण आणि पालखी सोहळ्याचे मनमोहक सादरीकरण केले. ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना महाराष्ट्राची समृद्ध वारकरी परंपरा, आषाढी एकादशीचे धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व आणि भारतीय संस्कृतीतील भक्ती, समता व सद्भावनेचे मूल्य यांची ओळख करून देण्यात आली. पालकांनीही चिमुकल्यांच्या सादरीकरणाचे कौतुक करत शाळेच्या या उपक्रमाचे मनापासून स्वागत केले. या भक्तिमय आणि संस्कारमय कार्यक्रमाचे नियोजन व यशस्वी आयोजन प्रिन्सिपल मुंडे मॅडम,माहूरकर मॅडम, विजया मॅडम, चव्हाण सर व तुप्तेवार मॅडम यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आषाढी एकादशीचा सोहळा आनंद, भक्ती आणि सांस्कृतिक जतनाचा सुंदर संदेश देत अविस्मरणीय ठरविला.

## कै.शशिकांत चिद्रावार यांच्यास्मृतिप्रित्यर्थ भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

**देगलूर** -अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे माजी सचिव कै. शशिकांत नारायणराव चिद्रावार यांच्या द्वितीय पुण्यस्मरण दिनानिमित्त दिनांक ३० जुलै २०२६ रोजी देगलूर महाविद्यालयामध्ये भव्य रक्तदान शिबिर आणि वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



अडत व्यापारी शिक्षण संस्था आणि देगलूर महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासामध्ये विशेष योगदान दिलेल्या शांत, संयमी, शिस्तप्रिय व मितभाषी असे आदर्श व्यक्तिमत्व म्हणून ते सर्वपरिचित होते. देगलूर शहरातील सामाजिक, आध्यात्मिक, व्यावसायिक, शैक्षणिक, वैचारिक व औद्योगिक विकासात त्यांचे योगदान असलेले बहुआयामी व्यक्तिमत्व म्हणून शशिकांत चिद्रावार यांचे जीवन कार्य होते. त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ महाविद्यालयातील छउउ राष्ट्रीय छात्र सेनेच्यावतीने रक्तदान शिबिर आणि छडड राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. प्रस्तुत भव्य रक्तदान शिबिरात जास्तीत जास्त तरुण- तरुणींनी व सुजान नागरिकांनी सहभागी होऊन राष्ट्रीय कार्यात योगदान द्यावे असे आवाहन अडत व्यापारी शिक्षण संस्था, देगलूर महाविद्यालय आणि चिद्रावार परिवार यांच्यावतीने करण्यात आले आहे. ज्या नागरिकांना रक्तदान करावयाचे आहे त्यांनी आपले नाव प्रा. बालाजी कतुरवार मोबाईल क्र.९४२३३०५८७० व डॉ. नीरज उपलंचवार मोबाईल क्र. ९८९०२ ७४७१७ यावर नाव नोंदवावे असे अवाहन करण्यात आले आहे.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती मंडळाच्या अध्यक्षपदी अंकुश गायकवाड; स्वागताध्यक्ष रमेश तालीमकर

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २४ जुलै -**

सिडको येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृह येथे शंकरराव बसवंते यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २१जुलै रोजी झालेल्या बैठकीत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती मंडळाच्या अध्यक्षपदी अंकुश गायकवाड, कार्याध्यक्षपदी रंगनाथ गजले तर स्वागताध्यक्षपदी रमेश तालीमकर यांची निवड करण्यात आली.

सिडको येथे दरवर्षी प्रमाणे साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे जयंतीउत्सव २०२६ च्या आयोजन सिडको-हडको परिसरातील समाजबांधवांची बैठक घेऊन यावर्षीच्या दोन दिवसीय जयंती महोत्सव साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार नूतन कार्यकारिणीत



जाहीर करण्यात आली.या जयंती महोत्सवाचे अध्यक्ष अंकुश गायकवाड, कार्याध्यक्ष रंगनाथ गजले, सचिव पप्पू गायकवाड, स्वागताध्यक्ष रमेश तालीमकर, कोषाध्यक्ष नितीन वाघमारे, उपाध्यक्ष साईनाथ घोसले, विठ्ठल घाटे, चंदू कांबळे, सहसचिव सचिन मांजरमकर, संभाजी कांबळे, सहकोषाध्यक्ष साहेबराव डाकोरे, मनोज नवघरे, संघटक आनंदा वाघमारे, माधव गवाले, गोपाळ वाघमारे, चंद्रकांत डोम्पले, सोपान पवळे, रमेश गजले, सहसंघटक बालाजी वाघमारे, दिगांबर गायकवाड, तर संचलनासाठी प्रा. बालाजी गवाले व चंद्रकांत मेकाले यांची निवड करण्यात आली. यांच्यासह सल्लागार व अन्य पदाधिकाऱ्यांचीही नियुक्ती करण्यात आली.या बैठकीस दलित मित्र आर. जे. वाघमारे,माजी अध्यक्ष सुरेश कांबळे,माजी महात्मा फुले अध्यक्ष उत्तम घोडजकर,दलित मित्र माधव आंबटवार, उद्योजक माधव डोंपले, चंद्रकांत मेकाले, गोपीराज आंबटवार, देविदास सूर्यवंशी, संभाजी बसवंते, आनंदराव गायकवाड, आनंदा पवार, शंकरराव धिरडीकर, चंद्रकांत डोम्पले , निवृत्ती कांबळे,यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त माळाकोळीत आरोग्य शिबिर व वृक्षारोपण

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २४ जुलै -**

स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त कंधार-लोहा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली माळाकोळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य शिबिर व वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला.



प्राथमिक आरोग्य केंद्रात आयोजित आरोग्य शिबिराचे उद्घाटन माजी जिल्हा परिषद सदस्या तथा भाजप महिला मोर्चाच्या प्रदेश सरचिटणीस प्रणिता देवरे-चिखलीकर यांच्या हस्ते झाले. या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची डोळे तपासणी, सिकल सेल, रक्तातील साखर (शुगर), रक्तदाब आदी विविध आजारांची तपासणी केली. तसेच गरजू रुग्णांना मोफत औषधांचे वाटप करण्यात आले.

यानिमित्त प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसरात सावली देणाऱ्या विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी बोलताना प्रणिता देवरे-चिखलीकर म्हणाल्या की, पर्यावरणाचा ऱ्हास मानवामुळेच झाला असून त्याचे संवर्धन करण्याची जबाबदारीही मानवाचीच आहे. प्रत्येकाने किमान सात झाडे लावून त्यांचे संगोपन केले, तर भविष्यातील पिढ्यांना निरोगी आणि शुद्ध पर्यावरण मिळू शकेल.

या कार्यक्रमास तालुका आरोग्य अधिकारी डॉ. जगदीश कांबळे, डॉ. अनुपसिंग, डॉ. दीपाली काळे, डॉ. प्रकाश नागरगोजे, डॉ. शिंगारे, डॉ. शिंदे, माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रमुनी मस्के, माजी पंचायत समिती उपसभापती रोहित पाटील, माजी सरपंच हनुमंत धुळगुंडे, खेडकर सरपंच, रामदास पाटील, भीमराव नाईक, बाळू बाबर, माजी ग्राम पंचायत सदस्य परमेश्वर मुरकुटे, गणपत अण्णा तिडके, हणमंत लांडगे, तुकाराम पवार, प्राथमिक आरोग्य केंद्रातील अधिकारी-कर्मचारी, आशा सेविका, रुग्णवाहिका चालक अतिश कांबळे, तसेच मोठ्या संख्येने नागरिक व रुग्ण उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी जिल्हा परिषद सदस्य तथा माजी सरपंच चंद्रमुनी मस्के यांनी केले.

## जिल्हा परिषदेत पेन्शन अदालत

**नांदेड, दि. २४ जुलै -**

सेवानिवृत्त झालेले शिक्षक व कर्मचारी तसेच पुढील सहा महिन्यांत सेवानिवृत्त होणारे शिक्षक व कर्मचारी यांच्या पेन्शनविषयक तक्रारी व प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी मंगळवार दिनांक २८ जुलै रोजी सकाळी ११वाजता जिल्हा परिषदेच्या कै. यशवंतराव चव्हाण सभागृहात पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

या पेन्शन अदालतीमध्ये प्रलंबित पेन्शन प्रकरणांचा सविस्तर आढावा घेऊन शक्यतो त्याच ठिकाणी तात्काळ निपटारा करण्यात येणार आहे. विभागीय चौकशीमुळे प्रलंबित असलेली प्रकरणे, न्यायालयीन प्रकरणे, सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन निश्चितीची प्रकरणे, वारसा हक्काची प्रकरणे तसेच इतर कारणांमुळे रखडलेली पेन्शन प्रकरणे यांचाही आढावा घेऊन आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे.

## नालंदा बुद्ध विहाराचे रविवारी उद्धाटन व बुद्धमूर्ती प्रतिष्ठापना

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २४ जुलै -**

वामनदादा कर्डकनगर, तरोडा बु. नांदेड येथे नालंदा बुद्ध विहाराचे उद्धाटन व बुद्धमूर्ती प्रतिष्ठापना रविवार, दि. २६ जुलै रोजी सकाळी १०-३० वाजता होणार असून यावेळी भदंत विनयबोधी प्रिय, भदंत पय्याबोधी थेरो, आ. बालाजी कल्याणकर, महापौर कविता मुळे, मंगेशदादा कदम (जिल्हाध्यक्ष, एससी/एसटी/ओबीसी शिवसेना) यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पीआरपीचे राज्य महासचिव बापूराव गजभारे हे राहणार आहेत.

यावेळी माजी उपमहापौर सतीश देशमुख यांच्या हस्ते धम्म ध्वजारोहण होणार असून, प्रमुख उपस्थितीत आंबेडकरी चळवळीचे नेते सुरेशदादा गायकवाड, रमेश सोनाळे, इंजि. प्रशांत इंगोले, विजयदादा सोनवणे, सुखदेव चिखलीकर, कैलास सावते, मराठा सेवासंघाचे जिल्हाध्यक्ष पंडितराव कदम, श्रीकांत गायकवाड, पत्रकार विकास कदम, मिलींद शिराढोणकर, दै. देशोन्नतीचे आवृत्तीप्रमुख अनिल कसबे, डॉ. करूणा जमदाडे, सुभाष काटकांबळे, राहुल प्रधान, महेंद्र पिंपळगावकर, संघरत्न कांबळे, इंजि. भरत कानिंदे, इंजि.डॉ. भीमराव हाटकर, माणिकराव देशमुख, कैलास वाघमारे, उद्योजक बाबुराव कसबे, एन.डी. गवळे, पी.एस. गवळे, राहुल वाघमारे आदींची उपस्थिती राहणार आहे.

सायंकाळी ६.४५ वाजता शाहीर गौतम पवार व संच यांचा बुद्धभीम गीतांचा जलसा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## प्रधानमंत्री आवास योजनेतील पात्र लाभार्थ्यांना प्रलंबित हप्ते तात्काळ वितरित करा : गिरिष कोत्तावार

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २४ जुलै -**

मुदखेड नगर परिषद हद्दीतील प्रधानमंत्री आवास योजना (घरकुल) अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना प्रलंबित असलेले पहिला व दुसरा हप्ता तात्काळ वितरित करण्यात यावा, अशी मागणी जिल्हा काँग्रेस कमिटी, नांदेडचे सरचिटणीस गिरीष कोत्तावार यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

मुदखेड शहरातील प्रधानमंत्री आवास योजना (घरकुल) अंतर्गत अनेक लाभार्थी शासनाच्या निकषानुसार पात्र असूनही त्यांचे घरकुल बांधकाम



पूर्ण झाले आहे किंवा अंतिम टप्प्यात आहे. मात्र, अनेक लाभार्थ्यांना पहिला तसेच पुढील हप्ते अद्याप प्राप्त झाले नसल्याने त्यांच्यावर आर्थिक संकट ओढवले आहे. काही लाभार्थ्यांनी बँक अथवा नातेवाईकांकडून कर्ज घेऊन घरकुलाचे बांधकाम पूर्ण केले असून, शासनाकडून अनुदानाची रक्कम मिळण्यास विलंब होत असल्याने त्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यापूर्वी दि. १६ जुलै २०२६ रोजी मुदखेड नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना याबाबत निवेदन देऊन पात्र लाभार्थ्यांचे प्रलंबित हप्ते तातडीने वितरित करण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, अद्यापही अनेक लाभार्थी अनुदानाच्या प्रतीक्षेत असल्याचे कोटवार यांनी म्हटले आहे.

या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन प्रधानमंत्री आवास योजना (घरकुल) अंतर्गत सर्व लाभार्थ्यांचे प्रलंबित हप्ते तात्काळ वितरित करावेत, प्रलंबित प्रकरणांची विशेष छाननी करून निधी वितरणाची प्रक्रिया गतीने पूर्ण करावी आणि लाभार्थ्यांना अनावश्यक विलंब होणार नाही, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना द्याव्यात, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या निवेदनावर जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस गिरिष कोत्तावार, गंगाधर मगरे, गजानन संबोड, शिवानंद देवके यांच्यासह स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## पद्मशाली समाजाच्या शिष्टमंडळानी घेतली जिल्हा पोलीस अधिक्षकांची भेट

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. २४ जुलै -**

पद्मशाली समाजाच्या प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या शिष्टमंडळाने मंगळवार (दि. २१ जुलै) रोजी नांदेडचे नवनियुक्त जिल्हा पोलीस अधीक्षक नीलभ रोहन यांची सदिच्छा भेट घेत समाजाशी संबंधित विविध प्रश्न व कायदा-सुव्यवस्थेच्या अनुषंगाने काही महत्त्वाच्या बाबी त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या.

यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक नीलभ रोहन यांनी शिष्टमंडळातील सदस्यांचे म्हणणे अत्यंत शांतपणे व संयमाने ऐकून घेत प्रत्येक विषयावर समाधानकारक उत्तरे दिली. संबंधित प्रश्नांवर कायदेशीर चौकटीत योग्य ती कार्यवाही करण्याबाबत त्यांनी सकारात्मक भूमिका व्यक्त केली. त्यांच्या अभ्यासू, संवेदनशील आणि लोकाभिमुख



कार्यपद्धतीमुळे उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी समाधान व्यक्त केले.

नांदेड जिल्ह्यात नुकतेच रुजू होऊनही येथील अनेक प्रकरणांचा आणि प्रशासकीय घडामोडींचा त्यांनी केलेला सखोल अभ्यास पाहून शिष्टमंडळाने त्यांच्या कार्यशैलीचे कौतुक केले. त्यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अधिक प्रभावी होईल, असा विश्वास व्यक्त करत त्यांच्या उज्ज्वल व यशस्वी कार्यकाळासाठी शुभेच्छाही देण्यात आल्या.

या प्रसंगी प्रकाश मारावर, श्रीनिवास अनंतवार, कोम्पलवार सर, सतीश राखेवार, चंद्रप्रकाश चन्ना, टिप्रेसवार सर, गाडीवले सर, साईनाथ उडतेवार, वाडेपल्ली सर, उमेश कोकुलवार, बामणे सर, शिवशंकर शिरमेवार यांच्यासह पद्मशाली समाजाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठी हल्ल्याच्या निषेधार्थ;भोकर शहरात कडकडीत बंद

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. २४ जुलै-**

दिल्ली येथे विद्यार्थ्यांनी पुकारलेल्या आंदोलनात पोलिसांनी केलेल्या बेछूट लाठी हल्ल्याच्या निषेधार्त वंचित बहुजन आघाडीने पुकारलेल्या महाराष्ट्र बंदला भोकर शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून गुरुवार दि.२३ जुलै रोजी शहरात कडकडीत बंद यशस्वी झाला आहे. या बंदमध्ये काँग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादी, मनसे,शेतकरी संघटना एम आय एम कम्यूनिस्ट या समविचारी पक्षाने पाठिंबा देवून बंद मध्ये सहभागी झाले होते.

नीट पेपर फुटी प्रकरणी संसद भवनावर मोर्चा काढतांना पोलिसांनी बेच्छूट लाठी हल्ला केला या हल्ल्यात अनेक विद्यार्थी विद्यार्थिनीं गंभीर जखमी झाले सरकार हुकूमशाही पद्धतीने वागत असल्याच्या निषेधार्थ वंचितचे राष्ट्रीय अध्यक्ष अँड.बाळासाहेब आंबेडकर यांनी महाराष्ट्र बंदची हाक दिली २३जुलै रोजी भोकरचा बाजार असूनही भोकर ची बाजारपेठ लहान लहानसाहान दुकाने हॉटेल पान टपऱ्या भाजीपाला मार्केट शाळा काँलेज बंद ठेवून व्यापाऱ्यांनी उत्तम प्रतिसाद दिलात

शिष्टमंडळाने तहसीलदार विनोद गुंडमवार यांच्यामार्फत महामाहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू व पंतप्रधानाना यांना मागण्याचे निवेदन सादर केले. निवेदनावर वंचित ब.आघाडीचे अँड. सिद्धार्थ कदम, काँग्रेस कमिटीचे तालुका अध्यक्ष गोविंद बाबा गौड, निळकंट वर्षेवार,एल. ए.हिरे,शिवसेनेचे तालुका अध्यक्ष संतोष आलेवार,सुभाष नाईक, साहेबराव भोंबे, पांडू वर्षेवार राष्ट्रवादी कांग्रेस शरद पवार गटाचे ता. अध्यक्ष अँड. शिवाजी कदम, शहराध्यक्ष दिलीप तिवारी, मनसेचे तालुकाध्यक्ष साई जेटालवार,वंचित चे मा. अध्यक्ष दिलीप राव, सुभाष तेले,काँ. शिवाजी गायकवाड, काँ. दिलीप पोतरे,राजेश चंद्रे,भीम टायगर सेनेचे मिलिंद गायकवाड,एम आय एमचे जुनेद पटेल.आदिनाथ चिंताकुटे,सुरेखा माळे आदिसह अनेकांच्या सह्या आहेत. पोलीस निरिक्षख विश्वाभर पलेवाड यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.